निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
रविवार
२२ फेब्रुवारी २०२६
पाने: ०४ किंमत: २ .००
वर्ष: १५ वे अंक: ३५७ वा

RNI.No.MAH/MAR2011/39247

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. G 2/RNP/AGD-441/2024-26 | मुख्य संपादक- सुग्रीव मुंडे


## महाराष्ट्र कौशल्य विकासात घेणार उंच भरारी; 'महादृष्टी' प्रकल्पाला केंद्र सरकारची मंजुरी

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी**/महाराष्ट्रातील तरुणांना जागतिक दर्जाचे कौशल्य प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगारासाठी सक्षम करण्यासाठी राज्य सरकारने आखलेल्या 'महादृष्टी' प्रकल्पाला केंद्रीय वित्त मंत्रालयाच्या छाननी समितीने हिरवा कंदील दाखवला आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी आशियाई विकास बँकेकडून (ADB) सुमारे ४,००० कोटी रुपयांचे अर्थसहाय्य मिळणार असून, यामुळे राज्यातील कौशल्य विकासाच्या क्षेत्राला मोठी गती मिळणार आहे.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी या निर्णयाचे स्वागत केले असून, हा प्रकल्प महाराष्ट्राला 'विकसित भारत २०४७' च्या दिशेने नेणारा एक महत्त्वाचा टप्पा ठरेल, असा विश्वास व्यक्त केला आहे.

प्रकल्पाची ठळक वैशिष्ट्ये आणि फायदे

या चार हजार कोटींच्या निधीतून राज्यात खालील महत्त्वाचे बदल घडवून आणले जाणार आहेत.ITI केंद्रांचे कायापालट: राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या (ITI) इमारतींची पुनर्बांधणी केली जाईल आणि तेथे प्रशिक्षणासाठी अत्याधुनिक यंत्रसामग्री उपलब्ध करून दिली जाईल.आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रशिक्षण: केवळ स्थानिकच नव्हे, तर जागतिक उद्योगांच्या मागणीनुसार विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावरील कौशल्य प्रशिक्षण दिले जाईल.महिला सक्षमीकरण: या प्रकल्पात महिलांसाठी विशेष तरतूद करण्यात आली असून, त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवण्यासाठी खास कौशल्य अभ्यासक्रम राबवले जातील.

ग्रामीण व दुर्गम भागावर लक्ष: दुर्गम भागातील तरुणांना दर्जेदार प्रशिक्षण मिळवून देण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल.

त्रिसूत्री विकासाचा संगम: दक्ष, पीएम-सेतू आणि महादृष्टी

मंत्री लोढा यांनी स्पष्ट केले की, महाराष्ट्र सध्या तीन मोठ्या प्रकल्पांच्या माध्यमातून युवकांचा विकास करत आहे:

दक्ष प्रकल्प: जागतिक बँकेच्या सहकार्याने कार्यरत.**महादृष्टी: आशियाई बँकेच्या मदतीने उर्वरित घटकांना सामावून घेणारा प्रकल्प.**

हे तिन्ही प्रकल्प एकमेकांना पूरक असून, यामुळे राज्यातील एकही घटक कौशल्य प्रशिक्षणापासून वंचित राहणार नाही. उद्योगांना लागणारे कुशल मनुष्यबळ तयार करण्यासाठी हा निधी सुनियोजितपणे खर्च केला जाणार आहे.महाराष्ट्र आर्थिक विकास परिषदेच्या शिफारशींनुसार आणि 'मित्रा' (MITRA) संस्थेच्या सहकार्याने हा अहवाल केंद्राकडे सादर करण्यात आला होता. या मंजुरीमुळे आता लवकरच सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार केला जाणार आहे. आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित अभ्यासक्रमांमुळे लाखो विद्यार्थ्यांना देशी आणि परदेशी कंपन्यांमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील 'कौशल्य भारत' मोहिमेला बळ देण्यासाठी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र आता अधिक रोजगाराभिमुख होण्यासाठी सज्ज आहे.

– मंगलप्रभात लोढा, कौशल्य विकास मंत्री

# पर्यावरण रक्षण हीच ईश्वरीय सेवा

## रासायनिक शेती सोडून निसर्गाकडे वळा! - राज्यपाल आचार्य देवव्रत यांचे परखड आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी**/वाढते प्रदूषण आणि हवामान बदल हे मानवी जीवनासमोरचे सर्वात मोठे संकट आहे. भावी पिढीला सुरक्षित भविष्य द्यायचे असेल, तर पर्यावरणाची सांगड थेट कृषी क्षेत्राशी घालणे अनिवार्य आहे. रासायनिक शेतीचा विळखा सोडून आता 'नैसर्गिक शेती' ही काळाची गरज बनली आहे, अशा शब्दांत राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी राज्याला पर्यावरणाच्या मुख्य प्रवाहात येण्याचे आवाहन केले.वरळी येथील एनएससीआय डोममध्ये आयोजित 'माझी वसुंधरा' ४.० आणि ५.० राज्यस्तरीय पुरस्कार वितरण** सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी त्यांनी पर्यावरण रक्षणासाठी **'पंचसूत्री'** मांडत प्रत्येक नागरिकाला 'क्लायमेट वॉरियर' बनण्याचे आवाहन केले.या भव्य सोहळ्याला विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे, मुख्य सचिव राजेश अग्रवाल आणि इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. राज्याच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांचा यावेळी गौरव करण्यात आला.

राज्यपालांची **'पर्यावरण पंचसूत्री'**

राज्यपालांनी आपल्या भाषणात केवळ कौतुक न करता, भविष्यातील कृती आराखडाच मांडला:

१. ग्रीन ऑडिट: प्रत्येक विकास प्रकल्पात पर्यावरणाचे परीक्षण अनिवार्य असावे.

२. ग्रीन बजेट: स्थानिक स्वराज्य संस्थांनी पर्यावरणासाठी स्वतंत्र तरतूद करावी.

३. कचरा व जल व्यवस्थापन: सौर ऊर्जा आणि पावसाच्या पाण्याचे संकलन यावर भर द्यावा.

४. नैसर्गिक शेती: रासायनिक खतांऐवजी नैसर्गिक शेतीला आर्थिक प्रोत्साहन द्यावे.

५. डिजिटल मॉनिटरिंग: वृक्षारोपण आणि जलसंधारणाची 'रिअल-टाइम' पाहणी करणारी पारदर्शक यंत्रणा हवी.

पुरस्कारांचा धडाका: पुणे आणि सातारा जिल्ह्यांचे वर्चस्व



या अभियानात पश्चिम महाराष्ट्रातील स्थानिक संस्थांनी बाजी मारल्याचे दिसून आले. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने १० लाखांहून अधिक लोकसंख्या गटात प्रथम क्रमांक पटकावून आपली छाप पाडली, तर सातारा, पाचगणी आणि बारामती या शहरांनीही आपल्या गटात अव्वल स्थान कायम राखले.पंकजा मुंडे (पर्यावरण मंत्री) आम्ही केवळ पुरस्कार देत नाही, तर शाश्वत विकासाचा पाया रचत आहोत. आगामी काळात 'जैविक शेती' हे या अभियानाचे पुढचे लक्ष्य असेल.सुनेत्रा पवार (उपमुख्यमंत्री): हे अभियान नसून लोकचळवळ व्हावी. दिवंगत नेते अजितदादांचे पर्यावरणपूरक महाराष्ट्राचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.राहुल नार्वेकर (अध्यक्ष, विधानसभा): निसर्ग ही पूर्वजांकडून मिळालेली देणगी आहे. तिचे रक्षण करणे ही पुढील पिढीसाठी आपली जबाबदारी आहे.या सोहळ्यात अभियानाच्या यशोगाथा सांगणारे 'कॉफी टेबल बुक' आणि पर्यावरण विषयातील संकल्पना स्पष्ट करणारा द क्लायमेट चेंज लेक्सिकॉन (मराठी-इंग्रजी शब्दकोश) या पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले.

## आरोग्य क्षेत्रातील योगदानाचा गौरव: 'वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्यरत्न' आणि 'महाआरोग्य सन्मान २०२६' सोहळा आज

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी**/सार्वजनिक आरोग्य क्षेत्रात अहोरात्र सेवा बजावणाऱ्या संस्था, वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या समर्पित कार्याची दखल घेण्यासाठी राज्य शासनातर्फे उद्या, २२ फेब्रुवारी २०२६ रोजी विशेष गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. मुंबईतील यशवंतराव चव्हाण केंद्र येथे सकाळी ११ वाजता हा कार्यक्रम पार पडणार असून, याद्वारे राज्याच्या आरोग्य व्यवस्थेला बळकटी देणाऱ्या अनेक महत्त्वाकांक्षी उपक्रमांचा शुभारंभही केला जाणार आहे.

हा सोहळा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न होत आहे. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रीय आयुष मंत्री (स्वतंत्र प्रभार) प्रतापराव जाधव उपस्थित राहणार आहेत. तसेच सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्यासह प्रशासनातील वरिष्ठ मान्यवर या प्रसंगी उपस्थित राहतील.

पुरस्कारांचे स्वरूप आणि गौरव

या सोहळ्यात दोन प्रमुख श्रेणींमध्ये पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत.

१. वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्यरत्न पुरस्कार

आरोग्य सेवा प्रभावीपणे राबवण्यासाठी आणि लोकसहभाग वाढवण्यासाठी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या संस्था, डॉक्टर, पत्रकार आणि आरोग्य कर्मचाऱ्यांना हा मानाचा पुरस्कार दिला जातो.

कालावधी: सन २०२३ ते २०२५ या कालावधीतील उत्कृष्ट कार्यासाठी.

पुरस्कारार्थी संख्या: एकूण २३ मान्यवरांचा गौरव.

पुरस्काराचे स्वरूप: १ लाख रुपये रोख, प्रशस्तीपत्र आणि स्मृतिचिन्ह.

२. महाआरोग्य सन्मान २०२६

तळागाळातील आरोग्य यंत्रणेत (प्राथमिक आरोग्य केंद्र ते जिल्हा रुग्णालय) कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी हा सन्मान आहे. यात जिल्हा शल्यचिकित्सक, वैद्यकीय अधीक्षक, आशा स्वयंसेविका आणि विशेष मोहिमांमध्ये योगदान देणाऱ्या क्षेत्रीय यंत्रणेचा समावेश असेल.

नव्या आरोग्य उपक्रमांचा शुभारंभ

केवळ पुरस्कार वितरणच नव्हे, तर राज्याच्या आरोग्य नकाशावर मैलाचा दगड ठरणारे दोन महत्त्वाचे उपक्रम उद्यापासून कार्यान्वित होत आहेत.महाराष्ट्र पॅलिएटिव्ह केअर कार्यक्रम: 'उपचारांपलीकडची शासनाची साथ' या ब्रीदवाक्यासह हा उपक्रम सुरू होत आहे. कर्करोग, हृदयरोग आणि वृद्धापकाळातील दीर्घकालीन आजारांनी ग्रस्त रुग्णांना घरीच वेदनाशमन उपचार, मानसिक आधार आणि समुपदेशन उपलब्ध करून देणे हा याचा उद्देश आहे.

राज्यस्तरीय 'मेनोपॉज क्लिनिक': रजोनिवृत्तीच्या काळात महिलांना उद्भवणाऱ्या शारीरिक आणि मानसिक समस्यांवर उपचार करण्यासाठी राज्यातील ५८० ठिकाणी हे क्लिनिक सुरू करण्यात आले आहेत. दर बुधवारी येथे विशेष ओपीडी (जझऊ) सेवा दिली जाईल.

इतर प्रकाशने आणि विशेष आकर्षण

या कार्यक्रमात आरोग्य विभागाच्या कामकाजात सुसूत्रता आणण्यासाठी विविध साहित्याचे प्रकाशन केले जाणार आहे:

आरोग्य दिनदर्शिका, हॉस्पिटल व पीएचसी (झकउ) मॅन्युअल.

'मात्र' (MAATR) उपक्रमांतर्गत आशा स्वयंसेविकांच्या मार्गदर्शनासाठी अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांच्या आरोग्यविषयक व्हिडिओचे अनावरण.

थोडक्यात सांगायचे तर: हा सोहळा केवळ सन्मानाचा नसून महाराष्ट्रातील आरोग्य सेवा अधिक मानवकेंद्री आणि दुर्गम भागातील जनतेपर्यंत पोहोचवण्याच्या राज्य सरकारच्या संकल्पाचे प्रतीक आहे.




## धक्कादायक! अनधिकृत होर्डिंगने घेतला मनपा कर्मचाऱ्याचा बळी; प्रशासनाचा आता 'हल्लो बोल', गुन्हे दाखल!

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी/**

शहरातील संजयनगर आणि मुकुंदवाडी परिसरात अनधिकृत बॅनर काढताना विजेचा तीव्र धक्का लागून अमोल दिनकर जाधव या मनपा सफाई कर्मचाऱ्याचा जागीच मृत्यू झाला.

या घटनेने महानगरपालिकेत शोकाकुल वातावरण असून, प्रशासनाने आता अवैध होर्डिंग लावणाऱ्यांविरोधात युद्ध पुकारले आहे.

आज सकाळी संजयनगर भागात अनधिकृत बॅनर हटवण्याचे काम मनपाच्या घनकचरा विभागाकडून सुरू होते. हे बॅनर काढत असताना अमोल



जाधव यांचा विजेच्या जिवंत तारांशी संपर्क आला. विजेचा धक्का इतका भीषण होता की त्यात अमोल यांचा मृत्यू झाला, तर त्यांचे सहकारी रविंद्र रेडलॉन हे गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर सध्या सिग्मा हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत.

प्रशासनाचा 'रुद्र' अवतार: आता थेट गुन्हे दाखल!

या घटनेनंतर मनपा आयुक्त जी. श्रीकांत आणि महापौर समीर राजूरकर यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे.

सदोष मनुष्यवधाचा गुन्हा: ज्यांनी हे अनधिकृत होर्डिंग लावले होते, त्यांच्यावर तात्काळ फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.इथून पुढे विजेच्या खांबांवर किंवा तारांजवळ अवैध बॅनर दिसल्यास, केवळ दंड नाही तर थेट **'सदोष मनुष्यवधाचा'** गुन्हा दाखल करून जेलमध्ये रवानगी केली जाईल, असा सज्जड दम आयुक्तांनी दिला आहे.

> ही घटना अत्यंत दुर्दैवी आहे. विमा आणि आर्थिक मदत कुटुंबाला स्थैर्य देईलच, पण शहरातील होर्डिंग संस्कृती संपवण्यासाठी नागरिकांनीही पुढाकार घेणे गरजेचे आहे.आम्ही हे सहन करणार नाही. ज्यांनी अनधिकृत होर्डिंग लावलेत, त्यांना कायद्याचा हिसका दाखवलाच जाईल.
>
> **– जी. श्रीकांत,**
> **आयुक्त, मनपा.**

विशेष मोहीम: संपूर्ण शहरात आता **'बॅनरमुक्त शहर'** ही विशेष मोहीम राबवून सर्व अनधिकृत होर्डिंग्ज जमीनदोस्त केले जाणार आहेत.

कुटुंबाला १.१५ कोटींची मदत आणि नोकरीचे आश्वासन

अमोल जाधव यांच्या निधनानंतर त्यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. मात्र, मनपा प्रशासनाने त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचा निर्णय घेतला आहे.

टर्म इन्शुरन्स-१ कोटी १५ लाख ,वारसाला नोकरी म्हणजे अमोल जाधव यांच्या पत्नीला अनुकंपा तत्त्वावर नोकरी.इतर मदत अंत्यविधी आणि इतर तातडीच्या गरजांसाठी मनपाकडून सर्वतोपरी सहकार्य. एका प्रामाणिक कर्मचाऱ्याचा जीव केवळ काही लोकांच्या हलगर्जीपणामुळे गेला आहे.

## देवगिरी आणि छत्रपती महाविद्यालयाला समाज कल्याण विभागाचा दणका!

### मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून बेकायदेशीर शुल्क वसुली केल्यास थेट 'ॲट्रॉसिटी'चे गुन्हे दाखल होणार

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी**/शिक्षण महर्षींच्या नावाखाली संस्था चालवणाऱ्या मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या देवगिरी महाविद्यालय आणि छत्रपती महाविद्यालयाचा मनमानी कारभार आता समाज कल्याण विभागाच्या रडारवर आला आहे. मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून बेकायदेशीर आणि अनाधिकृतपणे शुल्क वसुली (Fees) करणाऱ्या या महाविद्यालयांना सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभागाने लेखी नोटीस बजावून कडक शब्दात तंबी दिली आहे.



**वंचित बहुजन युवा आघाडीचा आक्रमक पवित्रा**

गेल्या अनेक दिवसांपासून देवगिरी आणि छत्रपती महाविद्यालयात अनुसूचित जाती (डउ) आणि इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून प्रवेशावेळी आणि परीक्षा फॉर्म भरताना शासनाचे नियम धाब्यावर बसवून सक्तीने शुल्क वसूल केले जात असल्याच्या तक्रारी येत होत्या. या विरोधात वंचित बहुजन युवा आघाडीचे पश्चिम शहर अध्यक्ष राहुल मकासरे यांच्या नेतृत्वाखाली शेकडो विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारावर जोरदार आंदोलन करण्यात आले होते.मकासरे यांनी पुराव्यासह समाज कल्याण सहाय्यक आयुक्तांकडे या लूटमारीबाबत तक्रार दाखल केली होती. विद्यार्थ्यांच्या या संतापाची दखल घेत अखेर प्रशासनाला जाग आली असून महाविद्यालयांना नोटीस धाडण्यात आली आहे.

काय म्हटले आहे समाज कल्याण विभागाने?

समाज कल्याण विभागाने काढलेल्या पत्रात (जा.क्र. सआसकछसं/भा.स.शि/२०२५-२६/३९४) स्पष्ट नमूद केले आहे की,शासन निर्णयानुसार अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारचे शुल्क वसूल करू नये, अशा स्पष्ट सूचना आहेत.

असे असतानाही महाविद्यालय बेकायदेशीररीत्या शुल्क वसुली करून शासनाच्या परिपत्रकाचे उल्लंघन करत असल्याचे समोर आले आहे.जर यापुढे कोणत्याही विद्यार्थ्याला शुल्काअभावी शिक्षणापासून वंचित ठेवले किंवा सक्तीने पैसे मागितले, तर त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांची असेल.महाविद्यालयाला कुलूप लावणार आणि गुन्हे नोंदवणार-**राहुल मकासरे**

या संपूर्ण प्रकरणावर बोलताना वंचित बहुजन युवा आघाडीचे राहुल मकासरे यांनी अधिक आक्रमक पवित्रा घेतला आहे. ते म्हणाले,प्रशासनाने आता केवळ नोटीस दिली आहे, पण यापुढे जर एकाही मागासवर्गीय विद्यार्थ्याला शुल्कासाठी अडवले, तर आम्ही शांत बसणार नाही. अशा महाविद्यालयांना थेट कुलूप ठोकले जाईल आणि संबंधित प्रशासनावर अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा, १९८९ (ॲट्रॉसिटी) अंतर्गत गुन्हे दाखल करण्यास भाग पाडू.

**विद्यार्थ्यांमध्ये समाधानाचे वातावरण**

महाविद्यालयाच्या मुजोरीमुळे गरीब आणि गरजू विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत होते. समाज कल्याण विभागाने घेतलेल्या या भूमिकेमुळे आणि वंचित बहुजन युवा आघाडीच्या संघर्षामुळे विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. आता या नोटिशीनंतर तरी महाविद्यालय व्यवस्थापन आपले डोळे उघडणार का? की पुन्हा विद्यार्थ्यांची लूट करणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## मुंबईत २२ आणि २३ फेब्रुवारीला 'एआय फॉर ग्री २०२६'

### जागतिक परिषदेचे आयोजन; कृषी क्षेत्रात येणार तंत्रज्ञानाची क्रांती

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/**

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना जागतिक तंत्रज्ञानाची जोड देण्यासाठी आणि शेतीमध्ये नाविन्यपूर्ण प्रयोगांना चालना देण्यासाठी मुंबईत २२ आणि २३ फेब्रुवारी २०२६ रोजी 'एआय फॉर ग्री २०२६' जागतिक परिषद व गुंतवणूक शिखर संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. वांद्रे-कुर्ला संकुल येथील जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर येथे ही परिषद पार पडणार असल्याची माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.

महाराष्ट्र कृषी-कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण २०२५-२०२९' अंतर्गत आयोजित या परिषदेत वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम, जागतिक बँक, आशियाई विकास बँक (ADB), युएनडीपी (UNDP) आणि इक्रिसॅट (ICRISAT) यांसारख्या नामवंत जागतिक संस्था सहभागी होत आहेत. कृषी क्षेत्रातील तज्ज्ञ, स्टार्टअप्स आणि गुंतवणूकदार एकाच व्यासपीठावर येणार आहेत.२२ फेब्रुवारी: सकाळी कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन होईल. पहिल्या दिवशी नंदन निलेकणी, केंद्रीय मंत्री पियुष गोयल आणि जागतिक बँकेचे परमेश्वरन अय्यर यांची मुख्य व्याख्याने होतील. दुपारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मुख्य उद्घाटन सोहळा संपन्न होईल. यावेळी 'महाएजिक्स' आणि 'भिली' आदिवासी भाषेतील 'लार्ज लँग्वेज मॉडेल' (LLM²) चे लाँचिंग तसेच कीड-रोग ओळखण्यासाठी सामंजस्य करार केले जातील.

२३ फेब्रुवारी: दुसऱ्या दिवशी डिजिटल कृषी पायाभूत सुविधा, शेतीतील महिलांसाठी एआय उपाय आणि 'जनरेटिव्ह एआय' या विषयांवर तांत्रिक सत्रे होतील. दुपारी 'गुंतवणूक चर्चा' होऊन आगामी २०२७ च्या परिषदेच्या संकल्पनेची घोषणा केली जाईल.

या परिषदेच्या माध्यमातून कृषी उत्पादनासाठी डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा (उझख) उभारणे, लिंग-आधारित डिजिटल दरी कमी करणे आणि स्टार्टअप्ससाठी गुंतवणुकीच्या नव्या संधी उपलब्ध करून देणे हे सरकारचे मुख्य उद्दिष्ट आहे. सुरक्षित डेटा एक्सचेंज आणि व्हॉइस टेलिफोनी तंत्रज्ञानामुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांपर्यंत थेट माहिती पोहोचवणे सोपे होणार आहे.

## मंत्रालयाचा 'भ्रष्टाचार' आणि सत्तेचा माजः झिरवळ यांच्या कार्यालयातील लाचखोरी म्हणजे हिमनगाचे टोक!

**ना खाऊंगा, ना खाने दूँगा अशा वल्गना करणाऱ्या सरकारच्या नाकाखाली, राज्याच्या सर्वोच्च शक्तीपीठ असलेल्या मंत्रालयात लाचखोरीचा जो नंगा नाच सुरू आहे, तो पाहून महाराष्ट्राची मान शरमेने खाली गेली आहे. नरहरी झिरवळ यांसारख्या 'साध्या आणि रांगड्या' नेत्याच्या कार्यालयातून जेव्हा लाचेचे व्यवहार होतात, तेव्हा समजून जावे की भ्रष्टाचाराची वाळवी महाराष्ट्राच्या प्रशासकीय इमारतीच्या पायापर्यंत पोहचली आहे.**

**एका मेडिकल स्टोअरवाल्याचा परवाना रद्द झाल्यानंतर, मंत्र्यांकडे दाद मागण्यासाठी गेलेल्या व्यक्तीकडे ५० हजारांची मागणी होणे आणि शेवटी ३५ हजारांत 'सेटलमेंट' होणे, हे एखाद्या भाजीबाजारातल्या व्यवहारासारखे वाटते. मंत्रालयातील लिपिक राजू ढेरींगे याला वरळी एसीबीने रंगेहाथ पकडले. पण खरा प्रश्न हा आहे की, एक साधा लिपिक मंत्र्यांच्या कार्यालयात बसून स्वतःच्या हिमतीवर एवढी मोठी रक्कम मागू शकतो का? आरोपीने स्वतः कबूल केले आहे की, तो खाजगी सचिवांच्या (झड) सांगण्यावरून हे करत होता. मंत्रालयाची संस्कृती अशी झाली आहे की, 'साहेब' कधीच समोर येत नाहीत; त्यांच्या नावाने कारभार हाकणारे हे 'खाजगी सचिव' आणि 'लिपिक' वसुलीचे माध्यम बनले आहेत.**

**नरहरी झिरवळ यांच्या साधेपणाचे किस्से महाराष्ट्राने खूप ऐकले. पण सत्ता हा असा आरसा आहे, ज्यात माणसाचे खरे चारित्र्य दिसते. झिरवळ यांच्या कार्यालयाला सील लागणे, ही मंत्रालयाच्या इतिहासातील अत्यंत लज्जास्पद घटना आहे. तरीही, आश्चर्य म्हणजे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि त्यांचा पक्ष झिरवळ यांच्या पाठीशी उभे राहतात! इतकेच नाही, तर ज्या क्लार्कने लाच घेतली, त्याला त्याच्या मूळ विभागात पाठवण्याची शिफारस खुद्द झिरवळ करतात. ही शिक्षा आहे की चोराला चोरी करण्यासाठी दुसरी सुरक्षित जागा? भ्रष्टाचारी माणसाला सस्पेंड करण्याऐवजी त्याची केवळ बदली करणे, हे सरकारचे भ्रष्टाचाराला असलेले मूक समर्थनच आहे.**

**'सिस्टीम'ची सडलेली मुळे**

**आपल्या व्यवस्थेचे विदारक चित्र लेखकाने मांडले आहे. खालचे अधिकारी प्रामाणिक असतील, तर वरून दबाव आणून 'सेटिंग' लावली जाते.**

**वरचे अधिकारी/मंत्री बेईमान असतील, तर खाली सगळा आनंदीआनंद असतो.मंत्रालयातील प्रत्येक कर्मचाऱ्याला दिवसाच्या शेवटी ३-३ हजार रुपये वाटले जायचे, हा किस्सा जर खरा असेल, तर मंत्रालय हे लोकशाहीचे मंदिर नसून भ्रष्टाचाराचा सर्वात मोठा अड्डा बनला आहे, हे उघड आहे. आमदारांना मंत्रिपद कशासाठी हवे असते? जनतेची सेवा करण्यासाठी? छे! मंत्रिपद हवे असते ते अशा 'डिल' करण्यासाठी, खाजगी सचिवांच्या माध्यमातून वसुली करण्यासाठी आणि सत्तेचा गैरवापर करण्यासाठी.**

**देवेंद्र फडणवीस गृहमंत्री आहेत, नरेंद्र मोदी दिल्लीत बसून स्वच्छ प्रशासनाच्या गप्पा मारतात. मग ज्या मंत्रालयात फडणवीस बसतात, त्याच इमारतीत लाच घेण्याचे धाडस होतेच कसे? भाजपचे सरकार जर गल्लीपासून दिल्लीपर्यंत आहे, तर मग भ्रष्ट मंत्र्यांवर आणि त्यांच्या सचिवांवर कडक कारवाई का होत नाही? केवळ लहान 'मोहरे' पकडले जातात आणि 'वजीर' मात्र नेहमीच सुरक्षित राहतात.**

**आजचा सामान्य माणूस गप्प बसलेला नाही. मेडिकल स्टोअर चालकाने एसीबीकडे तक्रार करून दाखवून दिले की, आता लोक अन्यायाविरुद्ध उभे राहत आहेत. पण सरकारने केवळ सस्पेंड करण्याचे नाटक न करता, थेट मूळ सूत्रधारांवर (मंत्र्यांवर) कारवाई करण्याची हिम्मत दाखवावी. भ्रष्टाचाराचा हा यज्ञ जर असाच पेटत राहिला, तर जनता येणाऱ्या निवडणुकीत या सत्तेच्या समिधा केल्याशिवाय राहणार नाही. झिरवळ यांचे प्रकरण हे केवळ एका कार्यालयाचे नसून, मंत्रालयातील 'कमिशन संस्कृती'चे प्रतीक आहे. आता वेळ आली आहे की, महाराष्ट्राने या 'साधेपणाच्या' बुरख्याखाली लपलेला भ्रष्ट चेहरा ओळखावा!**

# बापाचे प्रेम आणि आईचे संस्कार तुलना होऊ शकत नाही.

पुण्यातील एका चाळीत 'सदाशिव' (वय ५५) आणि त्यांचा मुलगा 'अनिकेत' (वय २१) राहत होते. सदाशिव मार्केट यार्डमध्ये हमालीचं काम करायचे. दिवसभर ५०-१०० किलोची पोती पाठीवर वाहून त्यांना दिवसाला ३००-४०० रुपये मिळायचे. त्यांच्या अंगावर नेहमी तोच एक पिवळसर झालेला पांढरा सदरा असायचा, ज्याला दोन-तीन ठिकाणी ठिगळं लावली होती.अनिकेत कॉलेजला होता.तो अभ्यासात हुशार होता,पण संगत वाईट होती.त्याला श्रीमंत मित्रांसारखं राहायची हौस होती.अनिकेतचा वाढदिवस जवळ आला होता.त्याने हट्ट धरला: बाबा, मला आयफोन (iPhone) पाहिजे. माझ्या सगळ्या मित्रांकडे आहे. मला साध्या फोनची लाज वाटते.

सदाशिवरावांच्या पायाखालची जमीन सरकली.बाळा, आयफोन ५०-६० हजाराचा येतो. आपला ६ महिन्यांचा पगार आहे तो. तुला मी साधा टचस्क्रीन फोन घेऊन देतो ना? अनिकेत चिडला. त्याने जेवणाचं ताट फेकून दिलं. तुम्ही नेहमी असंच करता! भिकारी आहोत का आपण? जर मला आयफोन मिळाला नाही, तर मी वाढदिवस साजरा करणार नाही आणि जेवणार पण नाही.

अनिकेत रागाने घराबाहेर निघून गेला. सदाशिवराव निमूटपणे ते सांडलेलं अन्न गोळा करू लागले. त्यांच्या डोळ्यात पाणी होतं.त्यांना माहित होतं की,मुलाचा हट्ट पुरवणं त्यांच्या आवाक्याबाहेरचं आहे.

पण बापाचं काळीज ते...मुलाने 'जेवणार नाही' म्हटल्यावर बापाला घास कसा जाईल? त्यांनी ठरवलं, काहीही करून पोराचा हट्ट पुरवायचा.पुढचे १० दिवस सदाशिवरावांनी अमानुष कष्ट केले.ते सकाळी ४ वाजता मार्केटमध्ये जायचे आणि रात्री १२ वाजेपर्यंत डबल शिफ्ट करायचे.त्यांनी दुपारचं जेवण बंद केलं, जेणेकरून ३० रुपये वाचतील. ते फक्त नळाचं पाणी पिऊन पोती उचलायचे.त्यांनी आपल्या लग्नातली शेवटची आठवण 'सोन्याची अंगठी' गुपचूप विकली.रक्त आटवलं,हाडं झिजवली.आणि कसेबसे ५०,००० रुपये जमा केले.

वाढदिवसाचा दिवस उजाडला.अनिकेत घरी वाट बघत होता. बाबा आले का नाही अजून? पैसे आणले नसतील म्हणून तोंड लपवत असतील. संध्याकाळचे ८ वाजले.अनिकेत ला फोन आला. पण तो बाबांचा नव्हता, तो 'ससून हॉस्पिटल' (Sassoon Hospital) मधून होता.हॅलो? सदाशिवरावांचा मुलगा का? लवकर या. तुमच्या वडिलांचा अपघात झालाय. अनिकेत घाबरला. तो धावत हॉस्पिटलला गेला.तिथे गेल्यावर डॉक्टरांनी त्याला शवागारात (Morgue) नेलं. तिथे एका स्ट्रेचरवर पांढऱ्या कपड्यात गुंडाळलेला सदाशिवरावांचा मृतदेह पडला होता.त्यांचा चेहरा शांत होता, पण शरीर खूप थकलेलं दिसत होतं.

डॉक्टर म्हणाले:त्यांचा अपघात नाही झाला. ते मार्केटमध्ये पोती उचलत होते. अचानक चक्कर येऊन पडले.त्यांचं 'हार्ट फेल' झालं.पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे.जेव्हा आम्ही त्यांचं पोस्टमॉर्टम केलं, तेव्हा समजलं की त्यांच्या पोटात अन्नाचा एक दाणाही नव्हता.गेल्या ३-४ दिवसांपासून ते बहुधा उपाशी होते.अति-श्रम आणि उपासमारीमुळे त्यांचं शरीर आतून खलास झालं होतं.

अनिकेतच्या पायातली शक्तीच गेली.तो भिंतीला टेकून खाली बसला.नर्सने अनिकेतच्या हातात एक 'प्लास्टिकची पिशवी' दिली.हे घ्या, त्यांच्या खिशात या वस्तू सापडल्या.अनिकेतने थरथरत्या हाताने ती पिशवी उघडली.त्यात काय होतं? १. काही सुट्टे पैसे (जे रिक्षासाठी ठेवले होते). २. आणि एक 'सील-पॅक आयफोन' (New iPhone Box). ३. त्या बॉक्सवर एक रक्ताचा डाग लागला होता... सदाशिवरावांच्या घामाचा आणि कष्टाचा तो शिक्का होता.आणि त्या फोनसोबत एक चिट्ठी होती. (दुकानदाराकडून लिहून घेतली होती). त्यात लिहिलं होतं: बाळा अनिकेत, वाढदिवसाच्या शुभेच्छा!

रागावू नकोस राजा.थोडा उशीर झाला पैसे जमवायला.तू म्हणाला होतास ना, तुला माझ्या फाटक्या कपड्यांची लाज वाटते? म्हणून मी दुकानात जाण्याआधी अत्तर लावलं होतं, जेणेकरून तुला फोन देताना माझ्या घामाचा वास येऊ नये. आता हट्ट करू नकोस,पोटभर जेवून घे.मी थकलोय...थोडा आराम करतो.

ती चिट्ठी वाचून अनिकेतने हंबरडा फोडला. ज्या बापाला त्याने 'भिकारी' म्हटलं होतं, तो बाप राजासारखा मन असलेला निघाला.ज्या फोनसाठी त्याने बापाला शिव्या दिल्या होत्या, तो फोन आज त्याच्या हातात होता. पण तो फोन घेण्यासाठी आता 'बाप' जगात नव्हता.अनिकेतने तो ५० हजाराचा फोन तिथेच जमिनीवर आपटला.तो फोन फुटला. पण सदाशिवरावांचं हृदय आधीच फुटलं होतं. त्या रात्री अनिकेत त्या थंड पडलेल्या देहाजवळ बसून ओरडत होता: बाबा! उठा ना! मला नकोय फोन! मला तुम्ही हवे आहात! मी परत कधीच हट्ट नाही करणार! बाबा, एकदा डोळे उघडा! पण सदाशिवराव आता कधीच उठणार नव्हते. त्यांनी अनिकेतचा हट्ट पुरवला होता, पण त्याची किंमत स्वतःचा 'श्वास' देऊन चुकवली होती.आज अनिकेत खूप मोठा ऑफिसर झालाय. त्याच्याकडे आता लाखो रुपये आहेत.पण आजही, जेव्हा तो मार्केटमधून जातो आणि तिथे एखाद्या हमालाला पोती उचलताना बघतो.तेव्हा तो तिथेच उभा राहून रडतो.कारण त्याला त्या हमालाच्या घामात त्याच्या बापाचा 'त्याग' दिसतो.

आई-वडील आपली स्वप्नं पूर्ण करण्यासाठी स्वतःची स्वप्नं जाळून टाकतात. त्यांच्याकडे पाहून कधीच हट्ट करू नका.तुम्हाला जे सहज मिळतं, त्यासाठी त्यांनी किती अपमान आणि कष्ट सहन केले आहेत,हे तुम्हाला कधीच कळणार नाही.वस्तू तुटली तर नवीन मिळते,पण 'बाप' एकदा गेला की पुन्हा मिळत नाही.

आई चे संस्कार....

आई, मी तुला हजार वेळा सांगितलं आहे की चिंटूच्या समोर तुझी ती गावंढळ भाषा बोलू नकोस. उद्या त्याचा 'इंटरनॅशनल स्कूल' मध्ये इंटरव्ह्यू आहे. तिथे जाऊन त्याने 'कसा हाईस', 'बारा हाय न्हवं ' किंवा 'राम-राम' म्हटलं ना, तर माझं नाक कापलं जाईल! तिथे डोनेशन देऊनही ॲडमिशन मिळत नाही,स्टेटस आणि क्लास बघतात!

समीरने आपल्या आई कावेरीवर चिडत म्हटलं. गावाहून आलेल्या कावेरीदेवी शुद्ध देशी बोली बोलत होत्या. मुलाच्या शब्दांनी त्या शांत झाल्या. त्यांनी पोटलीतून काढलेले लाडू परत आत ठेवले.पोऱ्याला आपल्या हातचे लाडू खाऊ घालावेत,भरभरून आशीर्वाद द्यावा अशी त्यांची इच्छा होती,पण मुलाच्या 'स्टेटस'पुढे त्यांची माया दडपली गेली. समीर आणि त्याची पत्नी रिया मागच्या महिनाभरापासून आरव (चिंटू) कडून पोपटासारखं पाठ करून घेत होते aSay Hello, Say Good Morning, My name is aarav. घराचं वातावरण एखाद्या मिलिट्री ट्रेनिंगसारखं झालं होतं. कावेरीदेवींना कडक सूचना होती. इंटरव्ह्यू होईपर्यंत आरवपासून दूर राहायचं!

इंटरव्ह्यूचा दिवस : शहरातील सर्वात प्रतिष्ठित शाळा.सगळीकडे इंग्रजीत संवाद. समीर-रिया तणावात.प्रिन्सिपल ची. D'Souza यांच्या केबिनमध्ये इंटरव्ह्यू सुरू झाला.आरवणे रटलेली उत्तरे व्यवस्थित दिली. समीरच्या चेहऱ्यावर समाधान दिसत होतं.

अचानक प्रिन्सिपलने विचारलं,

बेटा, घरी एखादा मोठा पाहुणा आला किंवा आजी-आजोबांना भेटलास तर काय करतो?

समीरचं हृदय धडधडलं. हे तर शिकवलंच नव्हतं!

आरव शांतपणे खुर्चीवरून उतरला प्रिन्सिपलकडे गेला वाकून त्यांच्या पायाला हात लावला आणि म्हणाला-

परनाम गुरुजी! राम-राम!

क्षणभर संपूर्ण केबिनमध्ये शांतता पसरली

प्रिन्सिपल जोरात हसले आणि आरवला मांडीवर बसवलं.

मिस्टर समीर, ते म्हणाले,

आज सकाळपासून पन्नास मुलं आली. सगळे रोबोटसारखे 'हाय-हॅलो' म्हणत होते. पण तुमच्या मुलाने जे केलं, ते आपली संस्कृती आहे. हे संस्कार पुस्तकात मिळत नाहीत.

आरव आनंदाने म्हणाला, माझी आजी शिकवते! ती म्हणते विद्या विनय देते,आणि सर्वात मोठं शिक्षण म्हणजे नम्रता.

प्रिन्सिपल म्हणाले, भाषा संवादाचं साधन आहे, लाजेचं कारण नाही. तुमच्या आईंना माझा नमस्कार सांगा. तुमचा मुलगा त्याच्या वेगळ्या ओळखीमुळे निवडला गेला आहे.

घरी पोहोचताच समीर आईजवळ गेला. कावेरीदेवी तुळशीपाशी बसल्या होत्या.

समीर त्यांच्या चरणी नतमस्तक झाला.आई, मला माफ कर. झाड कितीही उंच झालं तरी मुळांपासून तुटलं तर सुकतंच. त्या दिवशी समीरला उमगलं. सूट-बूट आणि इंग्रजीने आपण 'मॉडर्न' होऊ शकतो,पण 'माणूस' संस्कारांनीच बनतो.त्या संध्याकाळी समीर घरात येताना म्हणाला राम-राम, आई.कावेरीदेवींच्या चेहऱ्यावर उमटलेलं स्मित कोणत्याही डिग्रीपेक्षा मौल्यवान होतं.

आधुनिक होणं चुकीचं नाही,पण आपल्या मुलांना,भाषेला आणि वडीलधाऱ्यांना विसरणं ही सर्वात मोठी चूक आहे.इंग्रजी एक भाषा आहे, कौशल्य आहे. पण मातृभाषा आणि संस्कार ही आपली खरी ओळख आहेत.तुमच्यासाठी प्रश्न आजची पिढी इंग्रजीच्या मागे लागून आपल्या संस्कारांपासून दूर जात आहे असं तुम्हाला वाटतं का? घरात मातृभाषा बोलण्यावर भर द्यायला हवा का?

**सोशल मीडिया संकलन**
**:- सागर रामभाऊ तायडे.**

## छत्रपती संभाजीनगरमधील ज्येष्ठ हकीम शेख मुख्तार यांचे निधन

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी/** शहरातील नूर कॉलनी, नारळीबाग येथील रहिवासी आणि ज्येष्ठ वैद्य शेख मुख्तार शेख हुसैन (७७) यांचे शुक्रवारी दुपारी दुःखद निधन झाले.

त्यांच्या निधनामुळे संपूर्ण परिसरात शोककळा पसरली असून, एका सेवाभावी व्यक्तिमत्त्वाचा अंत झाला आहे.

शेख मुख्तार हे एक कुशल हकीम म्हणून प्रसिद्ध होते. त्यांनी आयुष्यभर रुग्णसेवेला प्राधान्य दिले, ज्यामुळे समाजात त्यांना आदराचे स्थान होते. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले (शेख कासीम, शेख आसीम, एजाज पटेल), पाच मुली आणि नातवंडांचा मोठा परिवार आहे.

शुक्रवारी 'असर'च्या नमाजनंतर चिते खाना मशीद येथे त्यांच्या जनाजाची नमाज पार पडली आणि त्यानंतर चिते खाना कब्रस्तानमध्ये शोकाकुल वातावरणात त्यांच्यावर अंत्यसंस्कार (दफनविधी) करण्यात आले.

यावेळी विविध क्षेत्रांतील मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अरुण सरनाईक यांच्या जीवनावरील 'पप्पा सांगा कुणाचे...' माहितीपटाचे २७ फेब्रुवारीला प्रदर्शन

मुंबईः मराठी चित्रपटसृष्टीतील दिग्गज अभिनेते दिवंगत अरुण सरनाईक यांच्या जीवनावर आधारित 'पप्पा सांगा कुणाचे...' या विशेष माहितीपटाचे प्रदर्शन २७ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी ३ वाजता मुंबईतील पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी येथे आयोजित करण्यात आले आहे.या माहितीपटाची निर्मिती त्यांची कन्या डॉ. सविता सरनाईक-नाईकनवरे यांनी केली असून दिग्दर्शन संतोष पाठारे यांनी केले आहे. सरनाईक यांचा अभिनय प्रवास आणि दुर्मिळ आठवणींचा ठेवा यात पाहायला मिळणार आहे. रसिक प्रेक्षकांनी या प्रदर्शनास उपस्थित राहावे, असे आवाहन चित्रपट महामंडळाने केले आहे.

# रेवडी संस्कृतीला राजकीय पुढारीच जबाबदार; यांच्यावर कठोर कारवाईची गरज.

रेवडी संस्कृतीचे विष राजकीय पुढाऱ्यांनी पेरले आहे याचाच परिणाम म्हणून महागाईने अक्राळविक्राळ रूप धारण केले आहे.रेवडी संस्कृतीचा फायदा सर्वप्रथम राजकीय पुढारी स्वतः घेतात आणि दिखावा म्हणून १० टक्के जनतेला तुटपुंजा फायदा पोहचवितात.यावरून स्पष्ट होते राजकीय पुढारी स्वतः च्या सोयीनुसार व स्वार्थासाठी कोणत्याही प्रकारचे वाटेल तसे निर्णय घेतात हा राजकीय पुढाऱ्यांचा मोठा अपराध आणि गुन्हा आहे असे मी समजतो. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाचे राज्य सरकारांवरील ताशेरे योग्यच याचे मी स्वागत करतो.मी सर्वोच्च न्यायालयाला विनंती करेन की, शेतकरी, गरीब, सर्वसामान्यांना राजकीय पुढाऱ्यांनी स्वतःच्या स्वार्थासाठी करोडो लोकांना गुमराह करण्याचे काम केले आहे.

याकरीता सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारांमधील मोफत योजना जाहीर करणाऱ्यां राजकीय पुढाऱ्यांवर कठोर कारवाई करायला हवी.कारण राजकीय पुढारी आमजनतेची दिशाभूल करण्यासाठी रेवड्या वाटण्याचे चुकीचे काम करतात. यामुळे जनतेला फायदा कमी होतोच परंतु नुकसान जास्त होते.

त्याचेच प्रायश्चित्त आज सर्वसामान्यांना महागाईच्या रूपात भोगावे लागत आहेत. त्यामुळेच सरकारचे दिवसेंदिवस रोजगार निर्मितीकडे दुर्लक्ष होत आहे आणि सरकारच्या मोफत धोरणामुळे व चुकीच्या पद्धतीमुळे रोजगार निर्मिची पुर्णतः वाट लागली आहे.याचे मुख्य सुत्रधार राज्य सरकारे व त्यातील राजकीय पुढारी असल्याने त्यांच्या कठोर करावाईची गरज आहे.रेवडी संस्कृतीचा फायदा राजकीय पुढारी जास्त घेत आहेत. निवडणूका आल्यात की प्रत्येक पक्ष,राजकीय पुढारी प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या आश्वासनाचा भडीमार करतात आणि निवडून आले की त्यातली काही पुर्ती करावी लागते.

अशा पध्दतीने देशातील प्रत्येक राज्य सरकारे आपल्या स्वार्थासाठी मोफत गोष्टी देण्याच्या घोषणा करतात. कारण यात गरीब व सर्वसामान्यांचे हित कमी व राजकीय पुढाऱ्यांचे हीत जास्त दिसून येते.कारण मोफत अन्नधान्य, सायकली, गॅस,वीज,रोख रक्कम अनेक योजनेअंतर्गत पैसा वाटप यामुळे देशातील प्रत्येक राज्यांवर बोजा वाढत असतो ही बाब सत्य आहे.यावर अंकुश लावने गरजेचे आहे.परंतु राजकीय पुढारी सरकारी सुविधांचा गैरफायदा घेतात त्याचे काय? सर्वसामान्य किंवा गरीब यांना सरकार ज्या काही गोष्टी मोफत देतात यात त्यांचा काय दोष?मोफतची संस्कृती आणली कोणी? देशातील राज्यात जर मोफत वस्तू एक कोटीच्या वाटल्या जात असेल तर त्यांच्या दहा पट कमाई अप्रत्यक्षरीत्या राजकीय पुढारी करून घेतात.

देश स्वतंत्र होऊन ७८ वर्षे झालीत देशात व प्रत्येक राज्यात अनेक सरकारे आलीत आणि गेलीत परंतु एकाही सरकारने महागाईवर लक्ष दिलेच नाही आणि कमी करण्यावर अजीबात लक्ष दिले नाही.

याला दोषी राजकीय पुढारीच. आज देशात महागाईचा एवढा मोठा कळस उभा झाला आहे की,त्याची झळ देशाचा शेतकरी, बेरोजगार युवक, विद्यार्थी, गरीब, सर्वसामान्य मोठ्या प्रमाणात भोगत आहे.याचेच प्रायश्चित्त म्हणून देशात आत्महत्यांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे.

मोफत वस्तू कोणालाच नको असते आणि तशी आपली संस्कृती सुद्धा आहे.मोफत वस्तू म्हणजे माझ्या मते सरकारने दिलेले स्लो पॉयझनच म्हणावे लागेल.परंतु देशातील मुठभर राजकीय पुढारी भ्रष्टाचार करतात, वाममार्गाने पैसा कमवून डांबून ठेवतात,सरकारी सुविधा, पेंशन,भत्ते, गाडी, बंगला विदेशात पैसा गुंतवणे आणि करोडोंची मोठ्या प्रमाणात चलअचल संपत्ती डांबून ठेवतात तेव्हा यांच्यावर पाहिजे तशी कारवाई होतच नाही यामुळेही देशात व राज्यात महागाई आणि बेरोजगारीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.

देशात महागाई का वाढत आहे लोकांना मोफतची सवय का लागली आणि कुणी लावली या संपूर्ण प्रश्नांचे उत्तर फक्त राजकीय पुढारीच देवू शकतात.राजकीय पुढारी मोफतवर जास्त भर देतात कारण त्यांना कल्पना असते की आपल्या खीशातुन काय जाणार? परंतु फायदा आपलाच होणार. त्यामुळे हमखास मोफत सुविधा प्रदान करण्याचे काम सरकार करीत असते. परंतु उदाहरण द्यायचे झाले तर एका व्यक्तीला जर महिन्याला १००० रूपये खर्च येत असेल तर त्याला सरकार कडून फक्त १०० रूपयांचीच मोफत सुविधा उपलब्ध होते. कारण सरकार १०० रूपयांची वस्तू जर मोफत देत असेल तर महागाई १० पटीने वाढवीत असते आणि याची झळ शेतकरी, शेतमजूर, गरीब व सर्वसामान्यांना भोगावी लागते.

त्यामुळे देशातील वाढती महागाई व रेवडी संस्कृतीला जबाबदार राजकीय पुढारीच असल्याचे मी समजतो.आज देश विकासाच्या उंबरठ्यावर आहे परंतु रोजगारासाठी बेरोजगार युवक वनवन हिंडताना दिसतात हे सरकारला का दिसत नाही?याला जबाबदार सरकारने सुरू केलेली रेवडी संस्कृती, भ्रष्टाचार व सरकारचे चुकीचे धोरण.आजही राजकीय पुढाऱ्यांवर भ्रष्टाचारांचे आरोप लागतात भ्रष्टाचाराची हजारो कागदांची फाईल तयार होते.

परंतू सत्तेत आले की या संपूर्ण भ्रष्टाचाऱ्यांना सरकार कडून क्लीन चिट दिली जाते हे स्वतंत्र भारताचे दुर्भाग्य म्हणावे लागेल. सरकार जर लोकांच्या खात्यात थेट पैसे जमा करीत असेल तर त्यांनी काम का करावे असाही प्रश्न उपस्थित होतो!

काही राज्यांमध्ये सरकारने अलीकडच्या काळात निवडणूकीपूर्वी अचानक जाहीर झालेल्या रोख हस्तांतरण केल्या म्हणजेच रेवड्या वाटुन स्वतः स्वार्थ साधले हे तर आचारसंहितेचे व लोकशाही प्रणालीचे घोर उल्लंघनच म्हणावे लागेल.या संपूर्ण बाबींनवरून लक्षात येते की सत्तेसाठी सरकार किंवा राजकीय पुढारी कोणत्याही स्तरावर जायला मागेपुढे पाहत नाहीत हे कृषी प्रधान देशाचे दुर्भाग्य म्हणावे लागेल. शेतकऱ्याच्या मालाला योग्य भाव नाही, शेतकऱ्यांच्या आत्महत्या दिवसेंदिवस वाढतच आहे, बेरोजगारीचे प्रमाण वाढल्याने युवावर्गामध्ये मोठा मनस्ताप आहे.अति दुर्गम भागात सरकारचे दुर्लक्ष असल्याने कुपोषणाचे प्रमाण वाढत आहे.या महत्वपूर्ण गोष्टींकडे सरकार लक्ष न देता रेवड्या वाटून जनतेची,राज्याची व देशाची खुली दिशाभूल करत असल्याचे दिसून येते.सरकारने एक लक्षात ठेवले पाहिजे की,रेवड्या वाटण्यापेक्षा आरोग्य सुविधा व शिक्षण सुविधा मोफत करावी याचा फायदा सर्वांनाच होईल.एखाद्यावर वीज बिल किंवा कोणताही टॅक्स थकबाकी असला तर त्यावर सरकार कठोर कारवाई करते.

अशा परिस्थितीत त्यांना मोफत सुविधा का आठवत नाही? देशातील कोणत्याही व्यक्तीला मोफत सुविधा नकोच असते परंतु राजकीय पुढारी स्वतः च्या स्वार्थासाठी मोफतचे विष पेरण्याचे कम करीत असतात व यातुनच महागाई व बेरोजगारीची उत्पत्ती झाल्याचे पाहायला मिळते आणि यातूनच निर्माण होते कुपोषण, बेरोजगारी, मानसिक आरोग्यात बिघाड,आत्महत्या ह्या उघड्या डोळ्यांनी दिसून येतात.जय हिंद.

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**

## धूम्रपानाची सवय पडली महागातः माजी सैनिकाची अपंगत्व भरपाई याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली

**आत्ताच एक्सप्रेस**
**नवी दिल्ली/प्रतिनिधी/**
लष्करी सेवेशी संबंधित नसलेल्या वैयक्तिक सवयींमुळे (उदा. धूम्रपान) उद्भवलेल्या आजारासाठी 'अपंगत्व भरपाई' (Disability Pension) मागता येणार नाही, असा महत्त्वपूर्ण निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. दिवसाला सुमारे १० बिड्या ओढण्याच्या सवयीमुळे झालेल्या आजाराला लष्करी सेवेतील खडतर परिस्थितीशी जोडता येणार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

प्रकरणाची पार्श्वभूमी

सर्वेश कुमार नावाच्या माजी सैनिकाने अपंगत्व भरपाई मिळवण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. यापूर्वी 'सशस्त्र दल न्यायाधिकरणाने' (AFT) त्यांचा अर्ज फेटाळला होता. या निर्णयाला त्यांनी आव्हान दिले होते. न्यायमूर्ती अरविंद कुमार आणि न्यायमूर्ती प्रसन्ना बी. वराळे यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली.

न्यायालयाची महत्त्वाची निरीक्षणे

खंडपीठाने याचिका फेटाळताना वैद्यकीय नोंदी आणि लष्करी नियमांचा आधार घेतला:

वैयक्तिक सवयींची जबाबदारी: याचिकाकर्त्याला दिवसाला १० बिड्या ओढण्याची सवय होती. लष्कराच्या पेन्शन रेग्युलेशन (१९६१) मधील नियम १७३ आणि २००२ च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, मद्य, तंबाखू किंवा अमली पदार्थांच्या अतिसेवनामुळे उद्भवणाऱ्या अपंगत्वासाठी भरपाई दिली जाऊ शकत नाही.

आजाराचे स्वरूप: याचिकाकर्त्याला 'इश्चेमिक स्ट्रोक' (Ischemic Stroke) झाला होता. मेंदूला रक्तपुरवठा करणाऱ्या धमनीमध्ये रक्ताची गुठळी निर्माण झाल्याने हा आजार होतो. वैद्यकीय शास्त्रानुसार धूम्रपान हे या आजाराचे मुख्य कारण आहे.



सेवेशी संबंध नाही: हा आजार लष्करी सेवेमुळे झालेला नाही (attributability) किंवा सेवेतील प्रतिकूल परिस्थितीमुळे तो बळावलेलाही नाही (aggravation), असे न्यायालयाने नमूद केले.

इतर प्रकरणांशी तुलना

याचिकाकर्त्याच्या वकिलांनी 'बिजेंदर सिंग विरुद्ध भारतीय संघराज्य (२०२५)' या प्रकरणाचा दाखला दिला होता. मात्र, न्यायालयाने तो अमान्य केला. बिजेंदर सिंग हे सियाचीन ग्लेशियर सारख्या अत्यंत दुर्गम आणि उणे तापमानाच्या ठिकाणी कार्यरत होते, जिथल्या परिस्थितीचा त्यांच्या प्रकृतीवर परिणाम झाला होता. सर्वेश कुमार यांच्या बाबतीत तशी स्थिती नसल्याने दोन्ही प्रकरणे भिन्न असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

तज्ज्ञांचे मत

नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष महेश एस. धन्नावत यांनी या निकालाचे स्वागत करताना म्हटले की:

हा निकाल दिशादर्शक आहे. अपंगत्व हे सेवेमुळेच आले आहे हे सिद्ध करणे (ट्रिब्युटेबिलिटी) अनिवार्य आहे. केवळ भावनिक आधारावर दावे करता येत नाहीत; कायद्यात पुराव्यांना महत्त्व असते. सैनिकांनी आपल्या आरोग्याची आणि व्यसनांपासून दूर राहण्याची जबाबदारी घेणे आवश्यक आहे.

हा निकाल लष्करी दलातील जवानांसाठी एक स्पष्ट संदेश आहे. वैयक्तिक चुकांमुळे किंवा आरोग्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे उद्भवणाऱ्या समस्यांची कायदेशीर किंवा आर्थिक जबाबदारी लष्करावर टाकता येणार नाही. 'देशाच्या संरक्षणासोबतच स्वतःच्या आरोग्याचे रक्षण' ही देखील सैनिकांची वैयक्तिक जबाबदारी असल्याचे या निकालाने अधोरेखित केले आहे.

# सफाई कामगाराचा मृत्यू की 'हत्या'?

## दोषी अधिकाऱ्यांवर ३०२ चा गुन्हा दाखल करा; वंचित बहुजन युवा आघाडी आक्रमक

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी/** महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागात काम करताना सफाई कर्मचारी अमोल जाधव यांचा झालेला दुर्दैवी मृत्यू हा अपघात नसून प्रशासकीय निष्काळजीपणामुळे झालेली 'हत्या' असल्याचा खळबळजनक आरोप वंचित बहुजन युवा आघाडीने केला आहे.

या प्रकरणावरून शहरात संतापाची लाट उसळली असून, दोषी अधिकाऱ्यांवर खुनाचा (कलम ३०२) गुन्हा दाखल करण्याची मागणी पश्चिम शहराध्यक्ष राहुल मकासरे यांनी केली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, अमोल जाधव हे महापालिकेत सफाई कर्मचारी म्हणून कार्यरत होते. मात्र, त्यांच्या मूळ कामाव्यतिरिक्त त्यांना अतिक्रमण विभागाचे 'अनधिकृत बॅनर' काढण्याचे धोकादायक काम करण्यास सांगण्यात आले. हे काम करत असतानाच त्यांचा मृत्यू झाला. या घटनेत रणधीर रिडलॉन हे अन्य एक कर्मचारी गंभीर जखमी झाले आहेत.

**प्रशासनावर गंभीर आरोप**

राहुल मकासरे यांनी मनपा आयुक्त जी. श्रीकांत यांना दिलेल्या निवेदनात प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

**निवेदनातील प्रमुख मुद्दे खालीलप्रमाणे:**



**कामाचे स्वरूप:** सफाई मजुराला अतिक्रमण विभागाचे तांत्रिक आणि जोखमीचे काम कोणत्या नियमाने देण्यात आले?**निष्काळजीपणा:** अनधिकृत बांधकाम किंवा बॅनर काढणे हे काम केवळ अतिक्रमण विभागाचे असताना, सफाई कामगारांना बळी का दिले जात आहे?

**कायदेशीर कारवाई:** ज्या अधिकाऱ्यांनी जाधव यांना हे आदेश दिले, त्यांच्यावर मनुष्यवधाचा गुन्हा नोंदवावा.वंचित बहुजन युवा आघाडीने प्रशासनासमोर खालील मागण्या मांडल्या आहेत:

**आर्थिक मदत: मृत अमोल जाधव यांच्या कुटुंबाला पुनर्वसनासाठी १ कोटी रुपयांची तात्काळ मदत द्यावी.**

**जखमींना मदत:** जखमी रणधीर रिडलॉन यांना ५० लाख रुपयांची मदत जाहीर करावी.

**अनुकंपा नियुक्ती:** मृत कर्मचाऱ्याच्या कुटुंबातील एका सदस्याला तातडीने महापालिका सेवेत सामावून घ्यावे.

**फौजदारी गुन्हा:** दोषी अधिकाऱ्यांवर कलम ३०२ अंतर्गत गुन्हा दाखल करावा.हा केवळ अपघात नाही, तर प्रशासकीय यंत्रणेने केलेला घात आहे. एका गरीब कर्मचाऱ्याचा बळी घेणाऱ्या अधिकाऱ्यांना पाठीशी न घालता, त्यांच्यावर कठोर कारवाई झालीच पाहिजे. अन्यथा, वंचित बहुजन युवा आघाडी तीव्र आंदोलन छेडेल. - राहुल मकासरे

**(अध्यक्ष, वंचित बहुजन युवा आघाडी, पश्चिम शहर)**

---

## ग्रामपंचायत प्रशासक पदी सरपंचांनाच मुदतवाढ; 'ग्राम संवाद सरपंच संघटने'च्या लढ्याला मोठे यश

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर(प्रतिनिधी)** राज्यातील ग्रामपंचायतींचा कार्यकाळ संपल्यानंतर प्रशासक नियुक्त करण्याऐवजी विद्यमान सरपंचांनाच मुदतवाढ देऊन प्रशासकीय जबाबदारी सोपवावी, या मागणीसाठी 'ग्राम संवाद सरपंच संघटना' गेल्या अनेक दिवसांपासून लढा देत होती.

संघटनेच्या या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला आणि निवेदनांना अखेर यश आले असून शासनाने या मागणीवर सकारात्मक निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे संपूर्ण राज्यातील सरपंच वर्गात आनंदाचे वातावरण पसरले आहे.

गावपातळीवरील विकासकामांची सलगता राखण्यासाठी आणि लोकनियुक्त प्रतिनिधींना योग्य न्याय देण्यासाठी शासनाने घेतलेला हा निर्णय ग्रामविकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. प्रशासक म्हणून सरकारी अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याऐवजी अनुभवी सरपंचांकडेच कार्यभार राहिल्यामुळे प्रलंबित विकासकामांना गती मिळणार आहे. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांवरील सर्वसामान्यांचा विश्वास यामुळे अधिक दृढ होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

या ऐतिहासिक विजयाबद्दल बोलताना ग्राम संवाद सरपंच संघटनेचे प्रदेश सचिव विशाल पाटील म्हणाले की, हा विजय म्हणजे राज्यातील सर्व सरपंचांच्या एकजुटीचे प्रतीक आहे. गावाचा विकास आणि लोकशाही मूल्यांचे रक्षण करण्यासाठी आमची संघटना भविष्यातही अशीच ठामपणे उभी राहील.

तसेच संघटनेचे जिल्हा कार्याध्यक्ष गुलाब शहा यांनी नमूद केले की, सरपंचांना प्रशासकीय जबाबदारी सोपवणे हा अत्यंत योग्य निर्णय आहे.

यामुळे गावगाडा हाकताना तांत्रिक अडचणी येणार नाहीत आणि विकासकामांत खंड पडणार नाही. संघटनेच्या संघर्षाला यश मिळाल्याचा आम्हाला मोठा आनंद आहे.

ग्राम संवाद सरपंच संघटनेने या निर्णयाबद्दल राज्य शासनाचे आभार मानले आहेत. भविष्यातही ग्रामविकासाशी संबंधित प्रश्न सोडवण्यासाठी संघटना नेहमीच सकारात्मक आणि संघटित भूमिका घेईल, असा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. या निर्णयामुळे ग्रामीण भागातील राजकीय आणि सामाजिक वर्तुळात संघटनेच्या कार्याचे कौतुक होत आहे.

## पांचाळेश्वर वार्षिक यात्रा महोत्सवाच्या पंचरंगी पत्रिकेचे विमोचन संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी/** येथील १००८ नंदीश्वर दिगंबर जैन अतिशय क्षेत्र, पांचाळेश्वर येथे दि. २६ फेब्रुवारी रोजी आयोजित वार्षिक यात्रा महोत्सवाच्या जय्यत तयारीला सुरुवात झाली आहे. या महोत्सवाची संपूर्ण माहिती असलेल्या पंचरंगी माहिती पत्रिकेचे विमोचन नुकतेच मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडले.या पत्रिकेसाठी पाचोड येथील शोभाबाई अजित राजेंद्र संजय सम्यक तनिश सेठी परिवाराचे विशेष सहकार्य लाभले आहे. कार्यक्रमास आमदार विजयराजे पंडित, अध्यक्ष गौतमचंद काला, महावीर काला, अजित काला यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. तसेच, यात्रेतील महाप्रसादासाठी गुलाबचंदजी काला परिवार (उमापूरवाला) यांचे मोलाचे योगदान मिळाले आहे.अध्यक्ष गौतमचंद काला, सचिव भाऊसाहेब बाकलीवाल व विश्वस्त मंडळाने यात्रेच्या नियोजनाची जबाबदारी स्वीकारली आहे.अपेक्षित भाविक: छत्रपती संभाजीनगर, पुणे, जालना, अहमदनगर, पैठण यांसह विविध भागांतून हजारो भाविक उपस्थित राहणार आहेत.प्रचार व प्रसिद्धीची धुरा नरेंद्र अजमेरा आणि पियुष कासलीवाल सांभाळत असून, भाविकांनी या महोत्सवाचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

---

## लासूर स्टेशन येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या अद्ययावत इमारतीचे लोकार्पण; ६.५० कोटींचा निधी खर्च

**आत्ताच एक्सप्रेस**

**लासूर स्टेशन (प्रतिनिधी)** लासूर स्टेशन आणि परिसरातील नागरिकांच्या आरोग्यासाठी एक अत्यंत दिलासादायक पाऊल उचलण्यात आले आहे. येथील प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी शासनाच्या वतीने ६ कोटी ५० लाख रुपये खर्च करून बांधण्यात आलेल्या भव्य व अद्ययावत इमारतीचे लोकार्पण शनिवार, २१ फेब्रुवारी रोजी दिमाखात पार पडले.

यावेळी उपस्थित वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी मुख्यालयी राहून रुग्णांना चोवीस तास प्रामाणिक सेवा द्यावी, असे आवाहन आमदार प्रशांत बंब यांनी केले.या लोकार्पण सोहळ्याला आध्यात्मिक आणि राजकीय क्षेत्रातील मान्यवरांची मांदियाळी पाहायला मिळाली. कार्यक्रमाच्या व्यासपीठावर खालील मान्यवर उपस्थित होते:

प्रमुख मार्गदर्शक: अभयानंदगिरीजी महाराज,अध्यक्ष/प्रमुख पाहुणे: आमदार प्रशांत बंब,मान्यवर: सभापती शेषराव जाधव, जिल्हा परिषद सदस्या संगीता आमराव, पंचायत समिती सदस्या कविता चव्हाण, सुनील पाखरे, प्रशासकीय अधिकारी: जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. रंगनाथ तुपे उपस्थीत होते.या कार्यक्रमाला परिसरातील अनेक प्रतिष्ठित नागरिक आणि पदाधिकारी उपस्थित होते, ज्यामध्ये:अमोल जाधव, भाजप तालुकाध्यक्ष रवींद्र चव्हाण, आ. बंब यांचे स्वीय सहाय्यक रज्जाक पठाण, गोपाल वर्मा, माजी सरपंच मीना संजय पांडव, गणेश व्यवहारे, संदीप आमराव, प्यारेलाल शहा, नारायण वाकळे, संचालक मनीष पोळ, दादासाहेब तायडे, भाऊसाहेब चिंधे यांचा समावेश होता.याशिवाय वैद्यकीय अधिकारी, आरोग्य कर्मचारी, आशा सेविका, बाजार समितीचे संचालक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. नवीन इमारतीमुळे लासूर स्टेशन परिसरातील आरोग्य व्यवस्थेचा दर्जा उंचावणार असल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

**रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा - आ. प्रशांत बंब**

लोकार्पण सोहळ्यात बोलताना आमदार बंब म्हणाले की, ग्रामीण भागातील गरीब रुग्णांना वेळेवर उपचार मिळणे हा त्यांचा हक्क आहे. साडेसहा कोटी रुपये खर्चून सर्व सोयीसुविधांनी युक्त अशी इमारत आता सज्ज आहे. मात्र, केवळ इमारत असून चालणार नाही, तर डॉक्टरांनी आणि कर्मचाऱ्यांनी येथे उपस्थित राहून रुग्णांना माणुसकीच्या भावनेतून सेवा दिली पाहिजे.




---

## कारगिल युद्धातील जाज्वल्य शौर्याचा सन्मान: समाजसेवक साजिद मौलाना यांच्या हस्ते माजी सैनिक काशीनाथ बकले यांचा सत्कार

**आत्ताच एक्सप्रेस/छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी/** देशाच्या सीमांचे रक्षण करण्यासाठी आपले आयुष्य पणाला लावणाऱ्या खऱ्या नायकांचा सन्मान करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. याचेच एक उत्तम उदाहरण शहरात पाहायला मिळाले. १९९९ च्या कारगिल युद्धातील (ऑपरेशन विजय) शूर योद्धा आणि भारतीय सेनेतील निवृत्त अधिकारी काशीनाथ संताराम बकले यांचा समाजसेवक साजिद मौलाना यांच्या हस्ते नुकताच भावपूर्ण सत्कार करण्यात आला.माजी सैनिक काशीनाथ बकले यांनी भारतीय सैन्यात तब्बल १७ वर्षे अखंड सेवा बजावली. त्यांच्या लष्करी प्रवासाची काही ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.भरती व प्रशिक्षण: २८ डिसेंबर १९९५ रोजी ते भारतीय सैन्यात भरती झाले. त्यांचे खडतर प्रशिक्षण पुण्यातील प्रसिद्ध 'बॉम्बे सॅपर्स' (Bombay Sappers) केंद्रामध्ये पूर्ण झाले.रेजिमेंट: ते २७० इंजिनिअरिंग रेजिमेंट मध्ये कार्यरत होते, ज्यांचे ब्रीदवाक्य सदा विजय हे आहे. पदकांचा बहुमान: देशसेवेतील त्यांच्या शिस्तबद्ध आणि धाडसी कामगिरीबद्दल त्यांना आतापर्यंत १३ विविध पदकांनी सन्मानित करण्यात आले आहे.कारगिल युद्धातील 'ऑपरेशन विजय'चे साक्षीदार १९९९ मध्ये जेव्हा पाकिस्तानने कारगिलमध्ये घुसखोरी केली, तेव्हा 'ऑपरेशन विजय' अंतर्गत भारतीय सैन्याने शौर्याची पराकाष्ठा केली होती. या युद्धात काशीनाथ बकले यांनी प्रत्यक्ष रणांगणावर महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. अतिशय उणे तापमान आणि दुर्गम पहाडी भागात शत्रूचा मुकाबला करत त्यांनी देशाच्या सीमा सुरक्षित ठेवल्या.एक अनपेक्षित भेट आणि कृतज्ञतेचा सोहळा हा सत्कार सोहळा अत्यंत साध्या पण प्रभावी पद्धतीने पार पडला. काशीनाथ बकले हे कपड्यांच्या खरेदीसाठी 'शोएब कलेक्शन' येथे आले होते. तेथे त्यांची भेट समाजसेवक साजिद मौलाना यांच्याशी झाली. गप्पांच्या ओघात जेव्हा त्यांच्या लष्करी सेवेबद्दल आणि कारगिल युद्धातील योगदानाबद्दल समजले, तेव्हा साजिद मौलाना भारावून गेले. त्यांनी तात्काळ बकले यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला आणि त्यांच्या शौर्याला 'मानाचा मुजरा' अर्पण केला.

ज्या जवानांमुळे आपण आपल्या घरात सुरक्षित आहोत.

## छत्रपती शिवाजी महाराज हेच खरे राष्ट्रनिर्माते'; कॅनरा बँकेत शिवजयंती सोहळा उत्साहात संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी/**छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ एक राजे नव्हते, तर ते खरे राष्ट्रनिर्माते होते. त्यांच्या स्वराज्यनिष्ठेतून आणि प्रशासकीय कौशल्यातून आजच्या तरुण पिढीने प्रेरणा घेण्याची गरज आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध व्याख्याते रमेश शिंदे यांनी केले.

कॅनरा बँकेच्या छत्रपती संभाजीनगर क्षेत्रीय कार्यालयाच्या वतीने आयोजित शिवजयंती उत्सवात ते मुख्य वक्ता म्हणून बोलत होते. यावेळी बँकेचे कर्मचारी आणि त्यांचे कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाराजांचे प्रशासन: लोककल्याणाचा आदर्श

आपल्या व्याख्यानात रमेश शिंदे यांनी महाराजांच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकला. ते म्हणाले की, रयतेची काळजी: रयतेच्या भाजीच्या देठालाही हात लावू नका, असा कडक आदेश देणारे महाराज हे खऱ्या अर्थाने रयतेचे राजे होते.

प्रशासकीय सुधारणा: वतनदारी नष्ट करून आणि जमिनीची शास्त्रोक्त मोजणी करून त्यांनी एक सक्षम मुलकी प्रशासन व्यवस्था उभी केली, जी आजही आदर्श मानली जाते.

तरुणांना आवाहन: आजच्या स्पर्धात्मक युगात तरुणांनी अपयशाला न घाबरता महाराजांच्या चरित्रातून आशावाद आणि साहस शिकले पाहिजे.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कॅनरा बँकेचे सहायक महाव्यवस्थापक केशवमूर्ती बी. व्ही. होते. प्रमुख पाहुणे म्हणून स्मार्ट सिटीचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र जोगदंड आणि महानगरपालिकेचे नियंत्रक अधिकारी गणेश दांडगे यांची उपस्थिती होती.




कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कॅनरा बँकेच्या 'जयंती उत्सव समिती'च्या पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन आणि जयघोषाने संपूर्ण कार्यालय परिसर भारावून गेला होता. बँकेच्या कर्मचाऱ्यांनी सहकुटुंब उपस्थित राहून या सोहळ्याचा आनंद द्विगुणित केला.

## जालन्यातील शिष्टेकडी परिसराची तातडीने स्वच्छता

**आत्ताच ढक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी/** शहरातील प्रभाग क्र. १० मधील शिष्टेकडी परिसरात साचलेल्या कचऱ्याच्या ढिगाऱ्यांबाबत प्रसारमाध्यमांनी बातमी प्रसिद्ध करताच जालना महानगरपालिका खडबडून जागी झाली आहे. बातमीची दखल घेत प्रशासनाने गुरुवारी सकाळी तातडीने स्वच्छता मोहीम राबवली.

गेल्या अनेक दिवसांपासून या भागात कचरा आणि नाल्यांच्या अस्वच्छतेमुळे दुर्गंधी व आजारांचा धोका वाढला होता. पालिकेच्या कर्मचाऱ्यांनी यंत्रसामग्रीच्या साहाय्याने कचरा हटवून नाल्यांची साफसफाई केली. प्रशासनाच्या या जलद कारवाईमुळे स्थानिक नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. मात्र, ही स्वच्छता केवळ तात्पुरती न राहता प्रशासनाने नियमितपणे लक्ष द्यावे, अशी मागणी आता रहिवाशांकडून केली जात आहे.

---

## संक्षिप्त

### ७ वर्षीय जरिन मिर्झाचा पहिला रोजा; हर्सूल परिसरात कौतुकाचा वर्षाव

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी/**रमजानचा पवित्र महिना म्हणजे संयम, उपासना आणि श्रद्धेचा काळ. याच पवित्र महिन्यात हर्सूल येथील रियाज पार्क परिसरात राहणाऱ्या जरिन मिर्झा या ७ वर्षीय चिमुकलीने आपल्या आयुष्यातील पहिला रोजा अत्यंत उत्साहात आणि यशस्वीरित्या पूर्ण केला आहे. एवढ्या लहान वयात कडक उन्हाची तमा न बाळगता तिने दाखवलेल्या जिद्दीचे सर्वत्र कौतुक होत आहे.



जरिन ही मिर्झा अतीक बेग यांची कन्या असून, ती 'औरंगाबाद न्यूज'चे संपादक मिर्झा शफीक बेग यांची नात आहे. घरात असलेल्या धार्मिक वातावरणामुळे आणि पालकांच्या संस्कारांमुळे जरिनला बालपणापासूनच नमाज, रोजा आणि इस्लामी मूल्यांची गोडी लागली. मोठ्यांना रोजा ठेवताना पाहून तिच्या मनातही रोजा ठेवण्याची इच्छा निर्माण झाली होती.

सकाळी सहरीपासून ते सायंकाळी इफ्तारपर्यंत जरिनने पूर्ण दिवस कडक नियमांचे पालन केले. भूक आणि तहानेवर विजय मिळवत तिने मोठ्या उत्साहाने आपला पहिला रोजा पूर्ण केला. ७ वर्षांच्या कोवळ्या वयात तिने दाखवलेला हा संयम आणि धर्माप्रती असलेली श्रद्धा पाहून परिसरातील नागरिक थक्क झाले आहेत.

कौतुकाचा वर्षाव आणि शुभेच्छा पहिला रोजा यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल:कुटुंबीय: आई-वडील आणि आजी-आजोबांनी तिचे विशेष लाड पुरवत तिचे अभिनंदन केले.

नागरिक: रियाज पार्क परिसरातील मित्रपरिवार आणि शेजाऱ्यांनी जरिनच्या जिद्दीचे कौतुक करून तिला शुभेच्छा दिल्या.भविष्य: लहान वयातच धार्मिक कर्तव्याची जाणीव ठेवणारी जरिन इतर मुलांसाठी एक प्रेरणा ठरत आहे. तिच्या या यशाबद्दल आणि उज्वल भवितव्यासाठी सध्या सोशल मीडिया आणि परिसरात शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

### ७ वर्षांच्या अतिफा मन्सुरीचा पहिला रोजा पूर्ण; साजापूर परिसरातून कौतुकाचा वर्षाव

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर (प्रतिनिधी)** रमजानचा पवित्र महिना म्हणजे संयम, शिस्त आणि भक्तीचा काळ. याच भक्तीचा आदर्श गंगापूर तालुक्यातील साजापूर येथील एका चिमुकलीने घालून दिला आहे. अवघ्या ७ वर्षांच्या अतिफा अजहर मन्सुरी हिने कडक उन्हाची तमा न बाळगता आपल्या आयुष्यातील पहिला रोजा (उपवास) यशस्वीरीत्या पूर्ण केला. तिच्या या जिद्दीचे आणि धैर्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.



भक्ती आणि जिद्दीचा संगम

सध्या उन्हाळ्याची चाहूल लागल्याने तापमानात वाढ होत आहे. अशा वातावरणात दिवसभर अन्न-पाण्याविना राहणे मोठ्यांसाठीही आव्हानात्मक असते. मात्र, अतिफाने पहाटेपासूनच रोजा धरण्याचा निश्चय केला होता. दिवसभर तिने अत्यंत आनंदाने आणि उत्साहाने हा उपवास पाळला. सायंकाळी इफ्तारच्या वेळी खजूर खाऊन तिने आपला रोजा पूर्ण केला.

कुटुंबीयांकडून उत्साहात अभिनंदन

अतिफाने वयाच्या सातव्या वर्षी दाखवलेल्या या धार्मिक ओढीबद्दल मन्सुरी कुटुंबात आनंदाचे वातावरण आहे. तिचा उत्साह पाहून वडील अजहर मन्सुरी, आजोबा अफसर मन्सुरी, तसेच चुलते इस्माईल मन्सुरी आणि मुजीब मन्सुरी यांनी तिचे विशेष कौतुक केले.


इतक्या लहान वयात धार्मिक संस्कारांचे पालन करण्याची अतिफाची जिद्द पाहून आम्हाला अभिमान वाटतो, अशी भावना तिच्या कुटुंबीयांनी व्यक्त केली.

परिसरातून शुभेच्छांचा ओघ

अतिफाच्या या कामगिरीबद्दल मन्सुरी कुटुंबातील नातेवाईक, मित्र परिवार आणि साजापूर ग्रामस्थांनी तिचे अभिनंदन केले आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातूनही या चिमुकल्या 'रोझेदारा'वर कौतुकाचा वर्षाव होत असून, अनेकांनी तिला भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

### चिमुकल्या जाराची मोठी जिद्द: पाचव्या वर्षी आयुष्यातील पहिला रोजा पूर्ण

आत्ताच एक्सप्रेस/खुलताबाद (प्रतिनिधी) इस्लाम धर्मातील अत्यंत पवित्र आणि आध्यात्मिक महिना म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रमजान महिन्यात उपवास, नमाज, संयम आणि दानधर्माला विशेष महत्त्व आहे. याच पवित्र महिन्याचे औचित्य साधून खुलताबाद तालुक्यातील वेरूळ येथील पाच वर्षीय चिमुकली जारा आसिफ शेख हिने आपल्या आयुष्यातील पहिला रोजा (उपवास) अत्यंत उत्साहात पूर्ण केला. तिच्या या कौतुकास्पद कामगिरीमुळे शेख कुटुंबासह संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण पसरले आहे. पहाटेच्या 'सहरी'पासून ते सायंकाळच्या 'इफ्तार'पर्यंत अन्नाचा कणही न घेता आणि पाण्याचा थेंबही न पिता अल्लाहची इबादत करणे, हे मोठ्यांसाठीही आव्हानात्मक असते. मात्र, अवघ्या पाच वर्षांच्या जाराने प्रचंड उष्णता आणि तहानेवर मात करत दिवसभर उपवास पाळला. केवळ उपवासच नव्हे, तर तिने दिवसभरात नमाज अदा करून व कुराण पठण करून आत्मशुद्धीच्या या मार्गावर आपले पहिले पाऊल टाकले. तिच्या या चिकाटीने आणि संयमाने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.सायंकाळी इफ्तारची वेळ झाली तेव्हा जाराच्या चेहऱ्यावर एक वेगळेच समाधान पाहायला मिळाले. या खास प्रसंगी शेख कुटुंबाने जाराचा विशेष सत्कार केला. नातेवाईक आणि परिसरातील नागरिकांनी तिला भेटवस्तू देऊन तिचे अभिनंदन केले.रमजान हा सब्र (संयम) आणि शुक्र (कृतज्ञता) शिकवणारा महिना आहे. आपल्या मुलांवर लहानपणापासूनच धार्मिक आणि नैतिक संस्कार व्हावेत, हीच आमची इच्छा आहे, असे मत तिच्या कुटुंबीयांनी यावेळी व्यक्त केले.खाण्यापिण्याच्या सवयी लक्षात घेता, जाराने दाखवलेली ही जिद्द वाखाणण्याजोगी आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातूनही तिच्या या पहिल्या रोजाचे फोटो व्हायरल होत असून, नेटकऱ्यांकडून तिच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. धार्मिक संस्कारांची जपणूक करत जाराने पूर्ण केलेल्या या पहिल्या रोजामुळे वेरूळ परिसरात तिचे विशेष कौतुक होत आहे.



# जालना जिल्हा 'शतप्रतिशत भाजपामय' करा; नवनिर्वाचित नगरसेवकांना पदवीधर नोंदणीचे लक्ष्य



**मराठवाडा पदवीधर मतदारसंघ ताब्यात घेण्यासाठी आ. संजय केणेकर यांचे जालन्यात आवाहन**

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** मराठवाडा पदवीधर मतदारसंघ पुन्हा एकदा भारतीय जनता पार्टीच्या ताब्यात मिळवण्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्याने कंबर कसणे आवश्यक आहे. पक्षाने दिलेले पदवीधर नोंदणीचे उद्दिष्ट गांभीर्याने घेऊन, नवनिर्वाचित नगरसेवक आणि जिल्हा पदाधिकाऱ्यांनी जनसंपर्क वाढवावा आणि जालना जिल्हा 'शतप्रतिशत भाजपामय' करावा, असे आवाहन भाजपा प्रदेश सरचिटणीस आमदार संजय केणेकर यांनी केले.जालना येथील भाजपा जिल्हा कार्यालयात शनिवारी (दि. २१) आयोजित भाजपा महानगर व जालना ग्रामीणच्या नगरसेवक आणि पदाधिकाऱ्यांच्या संवाद बैठकीत ते बोलत होते.

**प्रत्येक नगरसेवकाला ५०० नोंदणीचे लक्ष्य**

बैठकीत मार्गदर्शन करताना आ. केणेकर यांनी स्पष्ट केले की, संघटना ही केवळ पदावर नाही, तर पक्षाने दिलेल्या कामाच्या पूर्ततेवर चालते. ते म्हणाले,पक्षाकडून प्रत्येक कार्यकर्त्याच्या आणि लोकप्रतिनिधीच्या कामाचे मोजमाप केले जाणार आहे. आगामी निवडणुका लक्षात घेता, प्रत्येक नगरसेवकाने किमान ५०० पदवीधरांची नोंदणी पूर्ण करणे अनिवार्य आहे. मतदारांशी सतत संपर्क ठेवून संघटना अधिक मजबूत करा.

**जिल्ह्यातून विक्रमी नोंदणीचा निर्धार**

यावेळी भाजपा जिल्हाध्यक्ष आ. नारायणभाऊ कुचे आणि महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी ग्वाही दिली की, जालना जिल्ह्यातून पक्षाने दिलेल्या उद्दिष्टापेक्षाही अधिक नोंदणी करून मराठवाडा पदवीधर मतदारसंघात भाजपाचे वर्चस्व निर्माण करण्यासाठी सर्व पदाधिकारी सज्ज आहेत.या बैठकीस जालना जिल्ह्यातील भाजपचे दिग्गज नेते आणि पदाधिकारी उपस्थित होते, त्यामध्ये प्रामुख्याने आमदार नारायणभाऊ कुचे (जिल्हाध्यक्ष, ग्रामीण),भास्कर आबा दानवे (जिल्हाध्यक्ष, महानगर),वंदनाताई मगरे (महापौर), राजेश राऊत (उपमहापौर),प्रा. एम. के. देशमुख (संयोजक), संगीताताई गोरंटयाल (माजी नगराध्यक्षा),बद्रीनाथ पठाडे, अशोक अण्णा पांगारकर, रामेश्वर भांदरगे,युवा नेते अक्षय गोरंटयाल, महावीर ढक्का, अवधूत खडके यांसह अनेक मान्यवरांचा समावेश होता.बैठकीच्या दुसऱ्या सत्रात आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि पक्ष विस्तारावर चर्चा करण्यात आली. यावेळी जिल्हाभरातील शेकडो कार्यकर्त्यांनी उपस्थित राहून पदवीधर नोंदणी मोहीम यशस्वी करण्याचा संकल्प सोडला. यामध्ये प्रामुख्याने विजय कामड, विश्वजित खरात, सोपान पेंढारकर, सिद्धिविनायक मुळे, अमोल धानुरे यांसह महिला आघाडीच्या पदाधिकारी रिमा खरात, सखुबाई पणबिसरे व प्रियंका भूरेवाल यांचीही सक्रिय उपस्थिती होती. कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन करण्यासाठी जालना शहर आणि ग्रामीणमधील सर्व आजी-माजी पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# माळशेंद्रा येथील आशासेविका जिजा गाडेकर यांना राज्यस्तरीय 'वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्यरत्न पुरस्कार' जाहीर

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी/** आरोग्य सेवेतील उत्कृष्ट योगदानाबद्दल जालना जिल्ह्यातील माळशेंद्रा (प्रा. आ. केंद्र पिरपिंपळगाव) येथील आशासेविका श्रीमती जिजा सुखदेव गाडेकर यांची राज्यस्तरीय 'वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्यरत्न पुरस्कार २०२६' साठी निवड करण्यात आली आहे. या गौरवपूर्ण निवडीमुळे संपूर्ण जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, सर्व स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

मुंबईत होणार गौरव सोहळा

महाराष्ट्र शासनाच्या वतीने आयोजित वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्यरत्न पुरस्कार व महाआरोग्य सन्मान २०२६ या विशेष सोहळ्यात हा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे. हा दिमाखदार सोहळा रविवार, दि. २२ फेब्रुवारी २०२६



रोजी सकाळी १०:०० वाजता यशवंतराव चव्हाण सेंटर, जनरल जगन्नाथ भोसले मार्ग, नरीमन पॉईंट, मुंबई येथील मुख्य सभागृहात संपन्न होणार आहे.

जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांकडून गौरव

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. जयश्री पी. भुसारे-भोसले यांनी अधिकृत पत्रक काढून या निवडीची माहिती दिली आहे. श्रीमती जिजा गाडेकर यांनी ग्रामीण भागात आरोग्य सेवा पोहोचवण्यासाठी केलेले अथक परिश्रम आणि उत्कृष्ट कामाची दखल घेऊन ही निवड करण्यात आली आहे.

या पुरस्कार सोहळ्यासाठी उपस्थित राहण्याकरिता त्यांना रीतसर कार्यमुक्त करण्यात आले आहे.

सेवेचे फळ: सर्वत्र कौतुक

पिरपिंपळगाव प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत येणाऱ्या माळशेंद्रा परिसरात आशासेविका म्हणून काम करताना जिजा गाडेकर यांनी जननी सुरक्षा, लसीकरण आणि ग्रामीण आरोग्य जनजागृतीमध्ये मोलाची भूमिका बजावली आहे.

त्यांच्या या यशाबद्दल जिल्हा परिषद प्रशासन, आरोग्य विभाग आणि माळशेंद्रा ग्रामस्थांनी त्यांचे विशेष कौतुक केले आहे.श्रीमती जिजा गाडेकर यांच्या रूपाने जालना जिल्ह्यातील आरोग्य दूताचा सन्मान होत आहे, ही जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब आहे.

# माधवनगर पैठण येथे शिवजन्मोत्सव सोहळा उत्साहात संपन्न; 'श्री फ्रेंड्स ग्रुप'चा पुढाकार

**आत्ताच एक्सप्रेस**

**पैठण/प्रतिनिधी/** हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्मोत्सवाचे औचित्य साधून, पैठण येथील माधवनगर भागात शिवजयंती अत्यंत उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात साजरी करण्यात आली. एके क्रिएटिव्ह शॉप आणि डॉ. चव्हाण कॉम्प्लेक्स या ठिकाणी हा दिमाखदार सोहळा पार पडला.




कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन आणि पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी उपस्थित शिवप्रेमींनी 'जय भवानी, जय शिवाजी'च्या घोषणांनी परिसर दणाणून सोडला होता.हा सोहळा 'श्री फ्रेंड्स ग्रुप' माधवनगर यांच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या यशस्वी नियोजनासाठी अक्षय गणेश कुलथे यांनी पुढाकार घेतला. यावेळी परिसरातील मान्यवर आणि ग्रुपचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.याप्रसंगी भानुदासराव कुलथे, अशोक गायकवाड, अनिल वाळके, अविनाश राऊत, संदिप मोरे, संकेत वाळके, शंतनु गायकवाड, रामभाऊ सोनवणे, मदनराव मोरे, ऋतिक राऊत, सुनिल सर्जे, संदिप अंतरकर यांसह 'श्री फ्रेंड्स ग्रुप'चे सर्व सदस्य आणि शिवभक्त उपस्थित होते.

माधवनगर परिसरात या निमित्ताने भगवे ध्वज आणि फुलांची सजावट करण्यात आली होती. एकमेकांना शिवजयंतीच्या शुभेच्छा देत, महाराजांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प यावेळी कार्यकर्त्यांनी केला. कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांना प्रसाद वाटप करण्यात आले.

# अंबडमध्ये शिवकालीन युद्धकलेचा थरार; सव्यसाची गुरुकुलमच्या रणरागिनी आणि मावळ्यांनी जिंकली उपस्थितांची मने!

**नगरसेवक केदार कुलकर्णी यांच्या पुढाकाराने शहरवासियांना मिळाली ऐतिहासिक पर्वणी**

**आत्ताच एक्सप्रेस**

**अंबड / प्रतिनिधी/** विजेच्या चपळाईने फिरणारी तलवार, चित्तथरारक दांडपट्टा आणि 'हर हर महादेव'च्या जयघोषाने अंबड शहर रविवारी शिवमय झाले. निमित्त होते शिवजयंतीचे! कोल्हापूर जिल्ह्यातील वेंगरूळ (ता. भुदरगड) येथील सव्यसाची गुरुकुलमच्या मावळ्यांनी आणि रणरागिनींनी सादर केलेल्या शिवकालीन युद्धकलेच्या प्रात्यक्षिकांनी अंबडकरांच्या डोळ्यांचे पारणे फेडले.

पारंपरिक युद्धकलेचे जिवंत दर्शन

अंबड नगर पालिकेच्या वतीने आणि नगरसेवक केदार कुलकर्णी यांच्या विशेष पुढाकाराने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात आमदार नारायण कुचे आणि नगराध्यक्षा सौ. देवयानी केदार कुलकर्णी** यांच्या हस्ते शस्त्रपूजनाने झाली. यावेळी सव्यसाची गुरुकुलमच्या चमूने सादर केलेली प्रात्यक्षिके पाहून नागरिक थक्क झाले.

कार्यक्रमाची प्रमुख आकर्षणे:

तलवारबाजी व दांडपट्टा: एका रणरागिनीने एकाच वेळी चार जणांशी दिलेला तलवारीचा लढा पाहून उपस्थितांच्या काळजाचा ठोका चुकला. शारीरिक कसब: लाठी-काठी, ढाल-तलवार यासोबतच पारंपरिक व्यायाम प्रकार, दंड-बैठका, सूर्य नमस्कार, चंद्र नमस्कार आणि भूमी नमस्काराचे शिस्तबद्ध सादरीकरण करण्यात आले.प्रेरणादायी ऊर्जा: अत्यंत कठीण मानला जाणारा दांडपट्टा ज्या कौशल्याने मावळ्यांनी फिरवला, ते पाहून तरुण पिढीमध्ये शौर्याची नवी ऊर्जा संचारली.

लोकप्रतिनिधी आणि शहरवासियांचा प्रतिसाद

हा सोहळा यशस्वी करण्यासाठी 'समाजभान' टीमचे दादासाहेब थेटे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. नगरसेवक केदार कुलकर्णी यांनी तरुणांना आपल्या वैभवशाली इतिहासाची आणि विसर पडत चाललेल्या युद्धकलेची ओळख व्हावी, या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित केला होता.



अंबड शहरात प्रथमच अशा प्रकारचा भव्य आणि ऐतिहासिक वारसा जपणारा कार्यक्रम झाला. केवळ मनोरंजन नाही, तर ही आपल्या संस्कृतीची ओळख आहे, अशा भावना उपस्थित नागरिकांनी व्यक्त केल्या.

या कार्यक्रमाला उपविभागीय पोलीस अधिकारी सिद्धेश्वर धुमाळ पोलीस निरीक्षक संतोष घोडके, नगरसेवक गंगाधर वराडे, अमोल वराडे, राहुल शहाणे, धनराज ठाकूर यांच्यासह सर्व नगरसेवक, शाळांचे विद्यार्थी, शिक्षक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शरद मगर व गुरुकुलमची सई सुधन्वा गोंधळेकर यांनी अत्यंत प्रभावीपणे केले.अंबड शहरात यावर्षी खऱ्या अर्थाने 'प्रेरणादायी' शिवजयंती साजरी झाल्याची चर्चा संपूर्ण जिल्ह्यात रंगली आहे.

# शिवनगरमधील 'त्या' धोकादायक तारा अखेर हटवल्या; नगरसेविका सुलोचना गोर्डे यांच्या पाठपुराव्याला यश

**आत्ताच ढक्सप्रेस**

**जालना / प्रतिनिधी/** शहरातील प्रभाग क्रमांक १४ अंतर्गत येणाऱ्या शिवनगर भागात गेल्या अनेक वर्षांपासून लोंबकळणाऱ्या आणि निकामी झालेल्या तारांमुळे निर्माण झालेला अपघाताचा धोका अखेर टळला आहे. स्थानिक नगरसेविका सुलोचना लक्ष्मण गोर्डे यांनी पुढाकार घेऊन संबंधित विभागाकडून या तारा हटवून घेतल्या आहेत. यामुळे शिवनगरवासीयांनी सुटकेचा नि:श्वास सोडला असून परिसरातून समाधान व्यक्त होत आहे.

शिवनगर भागातील मुख्य रस्त्यावर विद्युत विभाग किंवा केबलच्या तारांचे जाळे मोठ्या प्रमाणावर विखुरलेले होते. यातील अनेक तारा निकामी झाल्या होत्या, तर काही अत्यंत खाली लोंबकळत होत्या. यामुळे अपघाताची भीती: रस्त्यावरून जाणाऱ्या दुचाकीस्वारांच्या गळ्यात या तारा अडकण्याची शक्यता होती.विद्यार्थ्यांची सुरक्षा: शाळेत जाणाऱ्या लहान मुलांसाठी या तारा गंभीर धोका ठरत होत्या.वाहतुकीस अडथळा: तारांचे जाळे रस्त्यावर पसरल्याने चारचाकी वाहने नेण्यास आणि पादचाऱ्यांना चालण्यास अडचण येत होती.

नगरसेविकांचा तत्पर पाठपुरावा

स्थानिक नागरिकांनी या समस्येबाबत वारंवार तक्रारी केल्या होत्या. या तक्रारींची दखल घेत नगरसेविका सुलोचना लक्ष्मण गोर्डे यांनी संबंधित प्रशासकीय विभागाकडे सातत्याने पाठपुरावा केला. रस्ते मोकळे करणे आणि संभाव्य जीवितहानी टाळणे किती गरजेचे आहे, हे त्यांनी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले. त्यांच्या या प्रयत्नांमुळे अखेर यंत्रणेने या भागातील सर्व निकामी तारा काढून रस्ता सुरक्षित केला आहे.

नागरी समस्यांचे त्वरित निराकरण करून सुरक्षित व सुसज्ज परिसर निर्माण करण्यासाठी मी कायम कटिबद्ध आहे. प्रभागातील नागरिकांनी कोणत्याही नागरी समस्येबाबत मला थेट दूरध्वनीवर किंवा प्रत्यक्ष भेटून कळवावे. महानगरपालिकेच्या माध्यमातून प्रत्येक समस्या सोडवण्यासाठी मी सदैव प्रयत्नशील राहीन.

**- सुलोचना लक्ष्मण गोर्डे (नगरसेविका, प्रभाग १४)**

अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला हा प्रश्न सुटल्यामुळे शिवनगर भागातील ज्येष्ठ



नागरिक आणि पालकांनी नगरसेविकांचे आभार मानले आहेत. रस्ता आता मोकळा आणि सुरक्षित झाल्याने अपघाताची टांगती तलवार दूर झाली आहे.

# हिवरा रोशनगाव दुमदुमले विठ्ठल नामाच्या गजरात; हभप पुंडलिक महाराज जंगले शास्त्रींच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी/** तालुक्यातील हिवरा रोशनगाव येथील निसर्गरम्य डोंगररांगांवर वसलेल्या श्री क्षेत्र विठ्ठल माळ येथे आयोजित पाच दिवसीय अखंड हरिनाम सप्ताहाची शुक्रवारी मोठ्या उत्साहात सांगता झाली. हभप पुंडलिक महाराज जंगले यांच्या रसाळ वाणीतून रंगलेल्या काल्याच्या कीर्तनाने या सोहळ्याचा समारोप झाला.वैकुंठवासी म्हातारबाबा शिंदे यांच्या आशीर्वाद आणि प्रेरणेतून, तसेच ग्रामस्थांच्या लोकवर्गणीतून श्री क्षेत्र विठ्ठल माळ येथे भव्य विठ्ठल-रुक्मिणी मंदिराची उभारणी करण्यात आली आहे. या नूतन मंदिरातील मूर्ती प्राणप्रतिष्ठा आणि कलशारोहण सोहळ्यानिमित्त १६ फेब्रुवारीपासून या विशेष अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. सप्ताहादरम्यान स्मृती प्रतिष्ठान व कलश स्थापना विधी अत्यंत शास्त्रोक्त पद्धतीने पार पडले. पाच दिवस चाललेल्या या उत्सवात पहाटे काकड आरती, विष्णूसहस्रनाम, नामस्मरण, दुपारी ग्रंथ वाचन आणि रात्री ख्यातनाम कीर्तनकारांची कीर्तने असे भरगच्च कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. या धार्मिक उपक्रमांमुळे संपूर्ण हिवरा रोशनगाव परिसर भक्तिमय झाला असून भाविकांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले होते.सप्ताहाच्या शेवटच्या दिवशी सकाळी १० ते १२ या वेळेत हभप पुंडलिक महाराज जंगले (शास्त्री) यांचे काल्याचे कीर्तन झाले. आपल्या निरुपणातून महाराजांनी विठ्ठल भक्तीचा महिमा सांगत उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.या सांगता सोहळ्यासाठी पंचक्रोशीतील हजारो भाविकांनी हजेरी लावली होती.पाचही दिवस भाविकांची गर्दी असूनही ग्रामस्थांनी चोख व्यवस्था ठेवली होती.भव्य मकीर्तनानंतर उपस्थित सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.मंदिराच्या उभारणीपासून ते सप्ताहाच्या आयोजनापर्यंत लोकवर्गणी आणि श्रमदानाचा मोलाचा वाटा राहिला.या सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी हिवरा रोशनगाव येथील ग्रामस्थ, तरुण मंडळी आणि विठ्ठल भक्त परिवाराने परिश्रम घेतले. या सप्ताहामुळे परिसरात आध्यात्मिक चैतन्य निर्माण झाले असून, विठ्ठल माळ हे ठिकाण आता भाविकांचे प्रमुख श्रद्धास्थान बनले आहे.

# तांदुळवाडी येथे मत्स्योदरी विधी महाविद्यालयाच्या ७ दिवसीय एनएसएस (NSS) शिबिराचे शानदार उद्घाटन

**आत्ताच ढक्सप्रेस**

**जालना / प्रतिनिधी**/मत्स्योदरी शिक्षण संस्था संचलित, मत्स्योदरी विधी महाविद्यालय, जालना यांच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजना (छडड) अंतर्गत सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिराचे तांदुळवाडी येथे उत्साहात उद्घाटन करण्यात आले. शाश्वत विकासासाठी युवक: पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन व पडीत जमीन विकास या संकल्पनेवर आधारित हे शिबिर ग्रामविकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख अतिथी डॉ. विठ्ठल गाडेकर यांच्या हस्ते करण्यात आले, तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य होते. यावेळी मार्गदर्शक म्हणून डॉ. राहुल भालेकर, तांदुळवाडीचे सरपंच श्री. आनंदजी भिसे, उपसरपंच सौ. ईश्वरदास भिसे, पोलीस पाटील श्री. गणेशजी भिसे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच तंटामुक्ती समिती अध्यक्ष श्री. निवृत्ती भिसे, श्री. प्रवीणजी भिसे, श्री. रामेश्वरजी भिसे, श्री. सहदेवजी भिसे यांच्यासह मान्यवर ग्रामस्थ उपस्थित होते.महाविद्यालयाचा गौरवशाली वारसा

प्रास्ताविक करताना प्रा. गोरे सर यांनी महाविद्यालयाच्या प्रवासावर प्रकाश टाकला. ते म्हणाले की, स्वर्गीय माजी खासदार अंकुशराव टोपे यांच्या दूरदृष्टीमुळे २००२ साली जालन्यात विधी महाविद्यालयाची स्थापना झाली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे कायदेविषयक शिक्षण मिळावे, हा यामागचा मूळ उद्देश होता. आज हे महाविद्यालय केवळ शैक्षणिक क्षेत्रातच नव्हे, तर सामाजिक कार्यातही अग्रेसर आहे.

'भारत २०४७' आणि युवकांची भूमिका

मुख्य मार्गदर्शक डॉ. विठ्ठल गाडेकर यांनी युवकांना पर्यावरणाप्रती जागृत राहण्याचे आवाहन केले. ते म्हणाले.भारत २०४७ या ध्येयाकडे वाटचाल करत असताना पर्यावरणाचे रक्षण करणे ही काळाची गरज आहे. विद्यार्थ्यांनी 'रिड्यूस, रियूज आणि रिसायकल' ही त्रिसूत्री अंगीकारावी. घरातून कापडी पिशवी नेण्यासारख्या छोट्या कृतीतून आपण मोठ्या बदलाची सुरुवात करू शकतो. तसेच डॉ. राहुल भालेकर यांनी पाणलोट व्यवस्थापनाचे महत्त्व सांगताना, ग्रामीण भागात जलसंधारण आणि मृदसंधारणाच्या कामात युवकांनी सक्रिय सहभाग नोंदवण्याचे आवाहन केले.

शिबिरादरम्यान होणारे उपक्रम

या सात दिवसांच्या कालावधीत तांदुळवाडी ग्रामस्थांच्या सहकार्याने विविध सामाजिक उपक्रम राबवले जाणार आहेत, ज्यामध्ये मुख्यत्वे:

स्वच्छता अभियान व सांडपाणी व्यवस्थापन.पाणलोट क्षेत्र सर्वेक्षण व पडीत जमिनीचा विकास.कायदेविषयक मार्गदर्शन शिबिर (ग्रामस्थांसाठी विनामूल्य सल्ला).

वृक्षारोपण आणि जनजागृती रॅली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. हंगरगे सर यांनी केले. या शिबिराच्या यशस्वीतेसाठी कार्यक्रमाधिकारी प्रा. पवार सर, प्रा. गोरे सर, प्रा. देशमुख सर, प्रा. जोशी सर यांच्यासह सर्व प्राध्यापक आणि स्वयंसेवक परिश्रम घेत आहेत.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अ‍ॅण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813